दैनिक
# सिंहवाणी वृत्त

गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७५ | किंमत : २ रूपये

# भारताने आठव्यांदा पटकावला आशिया कप

## भारतीय रणरागिनींचा सुवर्ण अध्याय, श्रीलंकेचा उडविला धुव्वा

**वृत्तसंस्था, दुबई**

भारतीय महिला क्रिकेट संघाने आशिया कपच्या इतिहासात आणखी एक सुवर्ण अध्याय लिहिला आहे. आशिया कप फायनल सामन्यात गतविजेत्या श्रीलंका संघावर ७२ धावांनी विजय मिळवत आशिया कपवर आठव्यांदा नाव कोरले. दुबईच्या मैदानात रंगलेल्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना शफाली वर्मा आणि स्मृती मंधानााने विक्रमी शतकी भागिदारी करीत श्रीलंकेसमोर धावांचा डोंगर उभारला. त्यानंतर गोलंदाजीत श्रीचरणी आणि दीप्तीसह भारताच्या



फिरकी गोलंदाजीसमोर श्रीलंकन संघ सपशेल अपयशी ठरला. त्यामुळे भारताचा मार्ग सुकर झाला. भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८३-५ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाने श्रीलंकेला १११ धावांवर ऑल आऊट केले. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वात भारताने चौथ्यांदा आशिया कप जिंकला. याआधी ९ अंतिम सामन्यांपैकी भारताने तब्बल ७ वेळा विजेतेपदावर कब्जा केला होता तर दोन फायनलमध्ये पराभव स्वीकारावा लागला होता. २०१८ मध्ये बांगलादेशने भारताला अंतिम सामन्यात पराभूत केले तर २०२४ मध्ये श्रीलंकेने भारताचा स्वप्नभंग केला होता. मात्र, यंदा भारताने त्या पराभवाचा वचपा काढत दिमाखदार विजय मिळवला. या विजयासह भारतीय महिला संघाने आशिया कपवरील आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले.

### टीम इंडियाची विजयी सलामी

टीम इंडियाविरुद्ध अफगाणिस्तान यांच्यातील पहिल्या टी-२० सामन्यात भारताचा शानदार विजय झाला. अफगाणिस्तान संघाने दिलेल्या १५७ धावांचे आव्हान भारताने ७ गडी राखत सहज पूर्ण केले. सलामीवर अभिषेक शमार्ची फटकेबाजी आणि इशान किशनची मिळालेली मोलाची साथ याच्या जोरावर अफगाणिस्तानचा ७ विकेट्सने पराभव झाला.

अंतिम सामन्याआधी भारतीय महिला संघाने आशिया कपमध्ये दमदार कामगिरी केली. साखळी फेरीत भारताने थायलंडचा ९४ धावांनी, हाँगकाँगचा १३७ धावांनी आणि पाकिस्तानचा ७ विकेट्सने पराभव केला. या विजयाच्या जोरावर भारताने ग्रुप-अ मध्ये अव्वल स्थान मिळवले होते. त्यानंतर उपांत्य फेरीत बांगलादेशला ४० धावांनी नमवत भारतीय संघाने अंतिम फेरी गाठली होती. संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर भारताचा खेळ प्रभावी राहिला. या शानदार खेळीच्या जोरावर आशिया कपचे जेतेपद पटकावले.

# दैनिक सिंहवाणी वृत्तचा आरती संग्रह 'टेकडी गणेशाच्या चरणी'





गणरायाच्या चरणी प्रथम आरती पुस्तिका अर्पण, दैनिक सिंहवाणी वृत्तच्या उपक्रमाचे श्रीराम कुळकर्णी यांच्याकडून कौतुक

**दैनिक सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठी व हिंदी भाषेतील दैनिक सिंहवाणी वृत्तच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 'आरती संग्रह-२०२६' या आरती पुस्तिकेचे प्रकाशन गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला नागपुरातील प्रसिद्ध श्री गणेश मंदिर टेकडी येथे गणरायाच्या चरणी प्रथम आरती पुस्तिका अर्पण करून करण्यात आले.

यावेळी श्री गणेश मंदिर टेकडी संस्थेचे अध्यक्ष श्रीराम कुळकर्णी, उपाध्यक्ष अरुण व्यास, सचिव दिलीप शहाकार, सहसचिव सुनील अग्निहोत्री, कोषाध्यक्ष हरी भालेराव, विश्वस्त अरुण कुळकर्णी, विकास लिमये, शांतीकुमार शर्मा, शरद वैद्य, कमलसिंग चोप्रा, वासुदेव गंगवाणी तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक सिंहवाणी वृत्तच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे अध्यक्ष श्रीराम कुळकर्णी यांनी कौतुक केले. सिंहवाणी वृत्तची वाटचाल अशीच यशस्वीपणे सुरू राहावी, यासाठी त्यांनी संस्थापक-मुख्य संपादक अजय बिवडे यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी दैनिक सिंहवाणी वृत्तचे संस्थापक-मुख्य संपादक अजय बिवडे, सह्याद्री फाउंडेशनचे व्यवस्थापक दिपक पसारकर, समन्वयक वैभव बागडे आणि छायाचित्रकार निशांत ठवरे उपस्थित होते.

**आकर्षक मांडणीसह संपूर्ण आरतींचा समावेश**

अतिशय आकर्षक आकारात प्रकाशित करण्यात आलेला 'आरती संग्रह-२०२६' गुळगुळीत कागदावर मुद्रित करण्यात आला असून, त्याची आकर्षक मांडणी व दर्जेदार छपाई हे विशेष आकर्षण ठरत आहे. गणपतीच्या विविध आरतींचा संग्रह या पुस्तिकेत करण्यात आला आहे. गणेशभक्तांना सहज उपलब्ध व्हावा, या उद्देशाने विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'आरती संग्रह-२०२६'ची पुस्तिका मोफत वितरित करण्यात येणार आहे. धार्मिक आणि सामाजिक बांधिलकी जपत दैनिक सिंहवाणी वृत्तने हाती घेतलेल्या या उपक्रमाला नागरिक व गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास संस्थापक-मुख्य संपादक अजय बिवडे यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्रात एअरफिश निर्मिती व ऑपरेशनल सेंटर उभारणीसाठी पुढाकार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर प्रकल्पाचा प्रस्ताव सादर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्रात अत्याधुनिक एअरफिश तंत्रज्ञानाची निर्मिती, देखभाल आणि संचालनासाठी केंद्र उभारण्याच्या दृष्टीने एअरफिशच्या प्रतिनिधी मंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन प्रकल्पाचा प्रस्ताव सादर केला. या शिष्टमंडळात सिंगापूरस्थित टॅन कोक हिआंग यूजीन यांच्यासह शिवांश मित्तल, सिद्धार्थ शर्मा आणि अमोल खंते यांचा समावेश होता. वित्त व नियोजन राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांचीही या बैठकीस उपस्थिती होती.



महाराष्ट्रात एअरफिश तंत्रज्ञानासाठी एकात्मिक उत्पादन आणि ऑपरेशनल इकोसिस्टम विकसित करण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. याअंतर्गत एअरफिशच्या देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हर हॉलिंगसाठी अत्याधुनिक मेंटेनन्स, रिपेअर अँड ओव्हरहॉल अर्थात एमआरओ सुविधा, तसेच एअरफिश तंत्रज्ञानाची निर्मिती, असेंब्ली आणि स्थानिक पातळीवर तंत्रज्ञान विकासासाठी मॅन्युफॅक्चरिंग अँड असेंब्ली युनिट उभारण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय व्यावसायिक आणि प्रवासी वाहतूक सेवांसाठी ऑपरेशनल सेंटर, जलवाहतूक आणि आधुनिक विमान वाहतूक यांना जोडणारे मेरिटाइम-एव्हिएशन नेटवर्क तसेच एव्हिएशन, मरीन इंजिनिअरिंग, उत्पादन आणि देखभाल क्षेत्रासाठी कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे नियोजन आहे.

यावेळी बोलताना शिवांश मित्तल म्हणाले, महाराष्ट्रात एअरफिश प्रकल्पाच्या माध्यमातून केवळ एक उत्पादन केंद्र उभारणे हा उद्देश नसून, हाय-स्पीड वॉटर ट्रान्सपोर्ट, अँडव्हेंचर राईड्स आणि एरोस्पेस इंजिनिअरिंगच्या क्षेत्रात नवकल्पनांना चालना देणारी स्वयंपूर्ण आणि शाश्वत इकोसिस्टम निर्माण करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

एअरफिश ही जलपृष्ठावरून तसेच हवेतून प्रवास करण्याची क्षमता असलेली आधुनिक वाहतूक संकल्पना असून, जलवाहतूक आणि विमान वाहतूक यांच्यातील दुवा म्हणून या तंत्रज्ञानाकडे पाहिले जात आहे. महाराष्ट्राची विस्तीर्ण किनारपट्टी, जलस्त्रोत, बंदरे आणि विकसित औद्योगिक पायाभूत सुविधा लक्षात घेता, अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. या प्रकल्पामुळे एव्हिएशन आणि मरीन टेक्नॉलॉजी, पर्यटन, स्थानिक उत्पादन, संशोधन व विकास, रोजगारनिर्मिती तसेच अत्याधुनिक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. भविष्यात महाराष्ट्राला एअरफिश तंत्रज्ञानाच्या उत्पादन आणि संचालनाचे प्रमुख केंद्र बनविण्याच्या दिशेने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

# पश्चिम बंगाल सरकारकडून राज्यातील २५२ मदरशे बंद

**कोलकाता :** पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील २५२ मदरशांना बंद करण्याचे आदेश दिले आहेत. सुमारे १०० इतर मदरशांना कारण दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे. सरकारचे म्हणणे आहे की, तपासणीत या मदरशांकडे मूलभूत सुविधा आढळल्या नाहीत. ही कारवाई अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागाने केली आहे. सरकारने रविवारी हे देखील सांगितले की, मानके पूर्ण करणारे मदरसे सुरू राहतील. ज्या संस्थांना नोटिसा दिल्या आहेत, त्यांच्या उत्तराची तपासणी केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. यापूर्वी २०२६ च्या अर्थसंकल्पात बंगाल सरकारने अल्पसंख्याक कल्याण आणि मदरसा विभागासाठीचा निधी ५,७१३ कोटींवरून २,१६५.४२ कोटींपर्यंत कमी केला होता. म्हणजेच, अर्थसंकल्पात सुमारे ३६०० कोटींची कपात झाली होती. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सरकारने जूनच्या सुरुवातीपासून पश्चिम बंगालमधील सर्व जिल्ह्यांमध्ये जमिनीवरील सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणामध्ये सरकारी आणि खासगी मदरशांच्या मूलभूत सुविधा, मंजुरीची स्थिती आणि व्यवस्थापन व्यवस्थेची तपासणी करण्यात आली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, संबंधित मदरशांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांच्या उत्तरांची तपासणी केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

# चिपळूणच्या सुधीर मोहिते यांच्या शरीरात तब्बल ३३ वर्षे राहिला १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटाचा धातूचा तुकडा, एमआरआय तपासणीमुळे उघडकीस आले सत्य!

**वृत्तसंस्था, मुंबई**

संगमेश्वर तालुक्यातील चिखली येथील सुधीर तुकाराम मोहिते (वय ५७) यांच्या शरीरात तब्बल ३३ वर्षांपूर्वी झालेल्या १९९३ च्या भीषण मुंबई बॉम्बस्फोटातील धातूचा एक तुकडा असल्याचे एमआरआय तपासणीदरम्यान समोर आले आहे. विशेष म्हणजे, इतकी वर्षे हा तुकडा त्यांच्या शरीरात असूनही त्यांना कधीही त्रास जाणवला नव्हता.

सुधीर मोहिते यांना सौम्य स्वरूपाचा ब्रेन स्ट्रोक आल्यामुळे ८ सप्टेंबर रोजी त्यांना मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचाराचा एक भाग म्हणून डॉक्टरांनी त्यांची एमआरआय तपासणी करण्याचे ठरवले. मात्र, मशीन सुरू असताना अचानक आवाज येऊ लागल्याने तपासणी तात्काळ थांबवून त्यांना बाहेर काढण्यात आले. यानंतर केलेल्या तपासणीत त्यांच्या ओठाच्या वरच्या भागातील गाठ नसून एक धातूचा तुकडा असल्याचे निष्पन्न झाले. हा तुकडा आरडीएक्स मिश्रित स्फोटातील अवशेष असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



१२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांच्या वेळी सुधीर मोहिते वरळी परिसरातील पासपोर्ट कार्यालयाजवळून १७२ क्रमांकाच्या बसने प्रवास करत होते. त्याच वेळी झालेल्या भीषण स्फोटात ते जखमी झाले होते. त्यावेळी त्यांच्या गालाला दुखापत झाल्याने कुटुंबीयांनी त्यांना दादरच्या शुश्रूषा रुग्णालयात नेले होते. जखमेवर ड्रेसिंग करून ते घरी परतले, पण त्या जखमेत स्फोटातील धातूचा तुकडा तसाच राहिला होता, ज्याची कल्पना त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना कधीच आली नाही.

ब्रेन स्ट्रोकवरील प्राथमिक उपचार पूर्ण झाल्यानंतर, ११ सप्टेंबर रोजी हिंदुजा रुग्णालयातील डॉ. कुमार ऋषी यांनी शस्त्रक्रिया करून हा धातूचा तुकडा मोहिते यांच्या शरीरातून यशस्वीरित्या बाहेर काढला. आता हा तुकडा पुढील वैज्ञानिक तपासणी आणि संशोधनासाठी पाठवण्यात येणार आहे. तीन दशकांहून अधिक काळ शरीरात धातूचा तुकडा सुरक्षित राहणे आणि एका साध्या वैद्यकीय चाचणीमुळे ३३ वर्षांपूर्वीच्या घटनेचे सत्य समोर येणे, ही एक अत्यंत दुर्मिळ वैद्यकीय घटना मानली जात आहे.

संपादकीय लेखणीतून...

# सकारात्मक विचारधारा

सकारात्मक विचारांचा दिवस दरवर्षी १३ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश सकारात्मक विचारधारेचे महत्त्व लोकांना समजावणे आहे. सकारात्मक विचारधारा म्हणजे जीवनातील समस्या आणि आव्हानांकडे आशावादी दृष्टीकोनातून पाहणे आणि त्यातून शिकण्याचा प्रयत्न करणे. हा दिवस प्रत्येकाला आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवण्याची आणि ते सकारात्मक करण्याची आठवण करून देतो. सकारात्मक विचारधारा आपल्याला शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे अनेक फायदे देते. यामुळे तणाव कमी होतो, आत्मविश्वास वाढतो, आणि जीवनात चांगल्या संधी निर्माण होतात. जेव्हा आपण सकारात्मक विचार करतो, तेव्हा आपल्याला समस्यांवर उत्तम तोडगा मिळतो, आणि आपले संबंधही अधिक सुदृढ होतात. तसेच, सकारात्मक विचारधारा आपल्याला अपयशाचा सामना करण्याची ताकद देते आणि जीवनातील खडतर काळातही आपल्याला प्रेरित ठेवते. सकारात्मक विचारांशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. आपल्या जीवनात आलेले नैराश्य, अंधार आपण सकारात्मक विचारांच्या शक्तीने पून्हा नव्या उमेदीने जीवन जगून आपल्या आयुष्यात आलेला अंधार दूर करु शकतो. आपल्या विचारांवर आपलेच नियंत्रण असल्याने आपल्यालाच ठरवायचे आहे, की सकारात्मक विचार करायचा आहे, की नकारात्मक? मात्र तरीही नकारात्मकच विचारच आपण जास्त करतो. आजपासून आपण नेहमी सकारात्मकच विचार करुया.

विचार दोन प्रकारचेः आपल्या मनातील विचार हे दोन प्रकारचे असतात- १) सकारात्मक विचार, आणि २) नकारात्मक विचार. या विचारांवर आपला दृष्टिकोन किंवा व्यवहार अवलंबून असतो. विशेष म्हणजे आपण जसा विचार करतो, तसे बनतो. म्हणूनच म्हटले जाते, की आपला जसा विचार असतो तसेच आपले आचरणदेखील असते. मग आचरण कसे ठेवायचे हे मुळात आपल्यावर अवलंबून असते. आपण कोणत्या रंगाचा चष्मा लावला आहे? आपण जर काळ्या रंगाचा चष्मा लावला असेल तर सर्वत्र काळेच काळे दिसेल आणि लाल रंगाचा असेल तर लालच लाल दिसेल, नाही का? याचप्रकारे नकारात्मक विचारांमुळे आपल्याला सर्वत्र नैराश्य, दुःख आणि असंतोष दिसते आणि सकारात्मक विचारांनी आपल्याला कायम आशा, सुख आणि समाधानच दिसते. आता आपण हे ठरवायचे आहे, की सकारात्मक चष्मा लावून जगाकडे पाहायचे, की नकारात्मक चष्म्याने पाहायचे? जर आपण सकारात्मकतेचा चष्मा लावला असेल तर आपल्याला प्रत्येक व्यक्ति चांगला वाटेल आणि जर नकारात्मक चष्मा लावला असेल तर आपल्याला सर्वत्र वाईटच दिसेल, आणि कालांतराने आपणही तसेच बनू.

**कसे बनाल सकारात्मक?**

सकारात्मकतेची सुरूवात आशा आणि विश्वासाने होत असते. कोणत्याही परिस्थितीत आत्मविश्वास हा गमवायचा नाही आणि नेहमी आशावादी राहायचे. एका ठिकाणी चारही बाजूंनी अंधार असेल आणि काहीच दिसत नसेल, तर त्याठिकाणी आपण एक लहानसा दिवा लावला तर त्या दिव्यामुळे एका क्षणात सर्वत्र पसरलेला अंधार दूर होईल. याचप्रकारे आशेचे किरण म्हणजेच सकारात्मक विचार सर्व नकारात्मक विचारांना एका क्षणात मिटवून टाकतात. नकारात्मकतेला नकारात्मक गोष्ट नष्ट करु शकत नाही, नकारात्मकतेला केवळ सकारात्मक गोष्टच नष्ट करू शकते. यासाठी जेव्हाही नकारात्मक विचार मनात येईल, त्याचवेळी सकारात्मक विचारात त्याचे परिवर्तन व्हायला हवे.

सकारात्मक बनण्यासाठी काही टिप्सः जीवनात नेहमी चांगलेच शोधा, न्युनगंड बाळगू नका. संकटांच्या बाबतीत विचार न करता आपल्यातील बलस्थानांच्या बाबतीत विचार करा, ज्यांच्या आधारे आपण त्या समस्या सोडवू शकू. दुसऱ्यांजवळ काय आहे? याबाबत काळजी न करता आपल्याजवळ जे काही त्यात समाधानी रहा. हा सकारात्मक दृष्टिकोन आपल्या जीवनातील नकारात्मता संपुष्टात आणेल. जे काम हाती घेतले आहे, ते पूर्ण करा. प्रत्येक काम अपूर्ण सोडले, तर आपल्या जीवनात नकारात्मक विचार प्रवेश करतात. नेहमी काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करा. जे पण काम आपल्या व्यवसायाशी संबंधीत आहे आणि आपल्याला ते काम येत नसेल, तर ते नक्की शिका. असे केल्याने आपण आपल्या कामात परिपूर्ण बनाल आणि आपल्या जीवनात सकारात्मक उर्जा संचारेल. वेळोवेळी निस्वार्थ भावनेने परक्या व्यक्तिंची मदत करुन पहा. असे केल्याने आपला सामाजिक दृष्टिकोन वाढेल आणि आपल्याबरोबरच समाजात सकारात्मक उर्जेचा प्रवाह प्रवाहित होईल. जे लोक नेहमी नकारात्मक विचार करतात किंवा नेहमी भांडणे, शंका करतात, त्यांच्यापासून चार हात लांबच रहा. सकारात्मक विचारसरणी बळावण्यासाठी नेहमी ध्यानधारणा करा आणि सकारात्मक विचार करणाऱ्या व्यक्तिंच्या संपर्कात रहा. प्रत्येक दिवशी एक नवे ध्येय निश्चित करुन कामास सुरूवात करा आणि त्या ध्येयाला नक्की पूर्ण करा. असे केल्याने आपले जीवन सकारात्मकतेकडे वाटचाल करण्यास सुरुवात करेल.

२००३ मध्ये एका अमेरिकन उद्योजकाने या दिवसाची सुरुवात केली होती. सकारात्मक विचारांमुळे ताणतणाव कमी होतो, मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारते आणि आत्मविश्वासात वाढतो. दररोज सकाळी उठल्यावर चांगल्या व प्रेरणादायी विचारांनी दिवसाची सुरुवात करा.

# युरेशियाची भू-राजकीय पुनर्रचना आणि भारत-रशिया धोरणात्मक अक्ष

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात आंतरराष्ट्रीय संबंधांची चौकट अत्यंत वेगाने बदलत आहे. शीतयुद्ध संपल्यानंतर निर्माण झालेली अमेरिकेची एकछत्री जागतिक व्यवस्था आणि पाश्चात्त्य राष्ट्रांचे संस्थात्मक वर्चस्व आता ऐतिहासिक आव्हानांचा सामना करत आहे. युक्रेन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि तिच्या मित्रराष्ट्रांनी रशियावर इतिहासातील सर्वात व्यापक आर्थिक, वित्तीय, राजनैतिक आणि व्यापारी निर्बंध लादले. रशियाच्या मध्यवर्ती बँकेची परकीय गंगाजळी गोठवणे, रशियन वित्तीय संस्थांना आंतरराष्ट्रीय संदेशवहन आणि व्यवहार प्रणालीतून बाहेर काढणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणावर बंदी घालणे या सर्व पावलांमागे मॉस्कोची चौफेर कोंडी करून रशियाला जागतिक पटलावर एकाकी पाडण्याचा उघड हेतू होता. मात्र, पाश्चात्त्य रणनीतीकारांच्या या अनुमानाला छेद देत रशियाने आपल्या परराष्ट्र धोरणाचा रोख आमूलाग्र पश्चिमेकडून पूर्वेकडे, म्हणजेच युरेशिया आणि आशियाई भूभागाकडे वळवला. या पूर्वेकडील धोरणाचा सर्वात भक्कम आणि विश्वासार्ह आधारस्तंभ म्हणून भारत वेगाने पुढे आला आहे.

भारत आणि रशिया यांच्यातील संबंध केवळ तात्कालिक नफा-तोट्यावर किंवा बदलत्या सत्तासमीकरणांवर आधारलेले नाहीत, तर त्यांना ऐतिहासिक विश्वासाची आणि खोलवर रुजलेल्या भू-सामरिक हितसंबंधांची पार्श्वभूमी लाभली आहे. शीतयुद्धाच्या काळात, विशेषतः एकोणीसशे एक्काहत्तरच्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान सोव्हिएत युनियनने भारताला दिलेला राजनैतिक आणि सामरिक पाठिंबा, तसेच काश्मीरच्या मुद्द्यावर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी वेळोवेळी वापरलेला नकाराधिकार हा या विश्वासाचा कणा राहिला आहे. भारताच्या तिन्ही संरक्षण दलांचे आधुनिकीकरण, देशांतर्गत अणुऊर्जा प्रकल्पांची उभारणी आणि अंतराळ मोहिमांच्या तंत्रज्ञान विकासात मॉस्कोने दिलेले सातत्यपूर्ण योगदान आजही भारताच्या सामरिक स्मरणात ताजे आहे. त्यामुळेच युक्रेन संकट सुरू झाल्यानंतर पश्चिमेने भारतावर रशियाशी असलेले सर्व संबंध तोडण्यासाठी अतोनात नैतिक आणि राजनैतिक दबाव आणला, तरी भारताने आपल्या ऐतिहासिक निष्ठा आणि समकालीन राष्ट्रीय हितांचा मेळ घालत एका स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची निवड केली.

भारतीय मुत्सद्देगिरीचे हे स्पष्ट प्रकटीकरण म्हणजे देशाची धोरणात्मक स्वायत्तता होय. भारताने कोणत्याही परकीय सत्तेच्या सांगण्यावरून किंवा धमक्यांना घाबरून स्वतःच्या धोरणांमध्ये बदल करण्यास स्पष्ट नकार दिला. आपल्या एक अब्ज चाळीस कोटी जनतेच्या ऊर्जा गरजा, देशांतर्गत महागाईचे नियंत्रण आणि आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात कच्चे खनिज तेल आयात करण्याचे धोरण कायम ठेवले. या निर्णयावर पाश्चात्त्य प्रसारमाध्यमांनी आणि राजकारण्यांनी टीका केली असता, भारताने पाश्चात्त्य दुटप्पीपणा जगासमोर उघडा पाडला. स्वतः युरोप रशियाकडून विशिष्ट ऊर्जा उत्पादने, समृद्ध युरेनियम आणि दुर्मिळ खनिजे गरजेनुसार आयात करत असताना भारताच्या वैध आर्थिक हितांवर प्रश्न उपस्थित करणे ही जुनी वसाहतवादी मानसिकता असल्याचे भारताने ठामपणे जगाला दाखवून दिले. भारताच्या या कणखर आणि स्वाभिमानी भूमिकेमुळे रशियाच्या राजकीय नेतृत्वाला हा ठाम विश्वास मिळाला की, भारत हा कोणाचाही मांडलिक नसून एक सार्वभौम महासत्ता म्हणून जागतिक पटलावर स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास पूर्णपणे समर्थ आहे.

या बदलत्या समीकरणांचा सर्वात मोठा परिणाम जागतिक वित्तीय संरचनेवर झाला आहे. पश्चिमेने जेव्हा डॉलर आणि आंतरराष्ट्रीय बँक व्यवस्थेचा वापर राजकीय हत्यारासारखा केला, तेव्हा विकसनशील अर्थव्यवस्थांनी स्वतःच्या चलनांमध्ये व्यापार करण्याचे मार्ग शोधून काढले. भारत आणि रशिया यांच्यातील नव्वद टक्क्यांहून अधिक व्यापार आता स्थानिक चलनांमध्ये म्हणजेच रुपया आणि रुबलमध्येकिंवा इतर पयार्यी चलनांमध्ये पार पडत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातून डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या या प्रक्रियेमुळे परकीय चलनाची पारंपरिक एकाधिकारशाही संपुष्टात येण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे.

या आर्थिक सहकार्याला प्रत्यक्ष जोड देण्यासाठी आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक मार्ग आणि चेन्नई ते व्लादिवोस्तोक सागरी मागार्सारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर काम वेगाने सुरू आहे. हे व्यापारी मार्ग केवळ अंतर आणि वाहतूक खर्च कमी करत नाहीत, तर ते सुएझ कालवा आणि पाश्चात्त्य नियंत्रणातील सागरी मार्गावरील जागतिक अवलंबित्व कमी करून युरेशियाच्या भू-आर्थिक नकाशाची पुनर्रचना करत आहेत. या सर्व घडामोडींमधून एका नव्या बहुध्रुवीय जगाची पायाभरणी होत आहे. शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय जग किंवा त्यानंतरचे एकध्रुवीय जग आता भूतकाळात जमा झाले असून, ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा समावेश असलेला गट तसेच शांघाय सहकार्य संघटना यांसारखे मंच जागतिक आर्थिक आणि राजकीय सत्तेचे नवे केंद्र बनले आहेत. क्रयशक्तीच्या आधारावर या उदयोन्मुख देशांच्या गटाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे पाश्चात्त्य श्रीमंत देशांच्या गटापेक्षा मोठे झाले आहे. पाश्चात्त्य देशांच्या संकुचित हितसंबंधांना छेद देत आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांचा आवाज आज अधिक बुलंद होत आहे. या प्रक्रियेत भारत हा विकसनशील जगाचा स्वाभाविक आणि विश्वासू प्रवक्ता म्हणून उदयास आला असून, रशियाने भारताच्या या जागतिक नेतृत्वाला पूर्ण मान्यता दिली आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांचे लोकशाहीकरण करण्यासाठी आणि संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारताला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळण्यासाठी रशियाचा असलेला बिनशर्त पाठिंबा याच व्यापक दृष्टिकोनाचा भाग आहे.

या युरेशियन मांडणीतील सर्वात गुंतागुंतीचा धागा म्हणजे रशिया, चीन आणि भारत यांच्यातील त्रिकोणीय संबंध. पाश्चात्त्य निबंर्धानंतर रशिया आणि चीन यांच्यातील सहकार्य मोठ्या प्रमाणावर वाढले असले, तरी मॉस्कोला हे भान आहे की पूर्णपणे बीजिंगवर विसंबून राहणे रशियाच्या स्वतःच्या दीर्घकालीन सामरिक हिताचे नाही. आशियामध्ये संपूर्ण समतोल टिकवून ठेवण्यासाठी रशियाला भारतासारख्या कणखर, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वतंत्र भागीदाराची नितांत आवश्यकता आहे. म्हणूनच, भारत आणि चीन यांच्यातील सीमावादात रशियाने कोणत्याही एका बाजूने न झुकता अत्यंत परिपक्व तटस्थता राखली आहे. दोन्ही देशांमधील समस्या या द्विपक्षीय संवादानेच सुटू शकतात आणि आशियातील शांततेसाठी दोन्ही प्राचीन संस्कृतींचे नेतृत्व सक्षम आहे, ही रशियाची भूमिका दर्शवते की भारताचे वजन आशियाई रणनीतीत किती निर्णायक आहे.

अखेर, पश्चिमेकडील कोंडीला न जुमानता आशियाशी जोडलेले रशियाचे भविष्य आणि भारतासोबतची त्याची धोरणात्मक घनिष्ठता ही एका ऐतिहासिक युगांतराची नांदी आहे. भारताची भूमिका ही रशियाचा आंधळा पाठीराखा अशी कधीच राहिलेली नाही; तर भारत एकाच वेळी जगातील इतर राष्ट्रांशी तंत्रज्ञान, व्यापार आणि सागरी सुरक्षेवर सहकार्य करतो आणि रशियाशी आपली पारंपरिक मैत्री तितक्याच ताकदीने जपतो. भारताच्या या बहुआयामी आणि स्वतंत्र मुत्सद्देगिरीला रशियाने दिलेला आदर हे सिद्ध करतो की, आगामी काळात आशियाच्या उदयासोबतच भारत-रशिया धोरणात्मक अक्ष हा जागतिक शांतता, आर्थिक स्वावलंबन आणि नव्या बहुध्रुवीय व्यवस्थेचा सर्वात भक्कम पाया ठरणार आहे.

- ९५६१५९५३०६

# आकडेवारीपलीकडचे क्रिकेट: तीन प्रारूपे, मानवी मर्यादा आणि धावसंख्येची महाशिखरे

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या ताळेबंदात नोंदी केवळ संख्या नसतात; त्या मानवी स्टॅमिना, बदलती मानसिकता आणि मैदानावर उसळलेल्या आक्रमकतेची जिवंत स्मारके असतात. कसोटीतील पाच दिवसांची तपश्चर्या, एकदिवसीय क्रिकेटमधील नियोजनबद्ध हल्ला आणि टी-२० मधील वीस षटकांचा विध्वंस—या तिन्ही फॉरमॅटमधील सर्वोच्च धावसंख्यांची यादी क्रिकेटच्या उत्क्रांतीचा संपूर्ण प्रवास एका चौकटीत उलगडून दाखवते. प्रत्येक आकड्यामागे केवळ बॅटचा तडाखा नाही, तर गोलंदाजांचे गळाठलेले हात, क्षेत्ब रक्षकांचे झालेले हाल, बदललेली मैदाने आणि काळानुसार बदललेली खेळाची व्याख्या दडलेली आहे.

**१. कसोटी क्रिकेट: संथ प्रवाहातून उभी राहिलेली महाशिखरे**

कसोटीत धावा करणे म्हणजे डोंगर कोरण्यासारखे असते, जिथे एका एका सत्रात खेळाडूची शारीरिक आणि मानसिक परीक्षा पाहिली जाते.

श्रीलंकेचा अजस्त्र डोंगर (९५२/६ घोषित): ऑगस्ट १९९७ मध्ये कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियमवर सनथ जयसूर्या (३४०) आणि रोशन महानामा (२२५) यांनी मिळून भारतीय गोलंदाजांवर जो घाव घातला, तो कसोटी इतिहासातील सर्वांत मोठा संघिक विक्रम ठरला. सलग अडीच दिवस क्षेत्ररक्षण करताना भारतीय संघाच्या सहनशीलतेचा अंत पाहणारा हा सामना आजही कसोटीतील फलंदाजीच्या एकाधिकारशाहीचे प्रतीक मानला जातो.

इंग्लंड आणि वेस्ट इंडिजचा ऐतिहासिक दरारा: १९३८ च्या अँशेसमध्ये ओव्हलवर लेन हटन यांच्या ३६४ धावांच्या बळावर इंग्लंडने उभारलेले ९०३/७, किंवा किंग्स्टनमध्ये सर गारफिल्ड सोबर्स यांच्या नाबाद ३६५ धावांच्या जोरावर वेस्ट इंडिजने नोंदवलेले ७९०/३ हे आकडे आधुनिक गिअर, हेल्मेट किंवा बॅट तंत्रज्ञानाशिवाय उभारलेले अद्भुत इमले होते.

भारताचे चेन्नईतील तांडव (७५९/७ घोषित): २०१६ च्या अखेरीस इंग्लंडविरुद्ध करुण नायरचे नाबाद त्रिशतक (३०३*) आणि के. एल. राहुलचे १९९ धावांचे योगदान भारताच्या कसोटीतील ताकदीचे नवे मानक ठरले. कसोटी क्रिकेटमध्ये जेव्हा संघ ७०० चा आकडा ओलांडतो, तेव्हा तो केवळ सामना जिंकत नाही, तर प्रतिस्पर्ध्याचे मनोधैर्य अनेक महिन्यांसाठी मोडून काढतो.

**२. एकदिवसीय क्रिकेट: रणनीतीकडून निर्दयी आक्रमणाकडे**

एकदिवसीय क्रिकेटचा इतिहास हा ३०० धावा सुरक्षित मानण्यापासून ते ५०० च्या उंबरठ्यापर्यंत पोहोचण्याचा प्रवास आहे.

जोहान्सबर्गचा तो अमर सामना (४३४ आणि ४३८): ऑस्ट्रेलियाने २००६ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध उभारलेले ४३४/४ हे तेव्हा मानवी कल्पनेच्या पलीकडचे वाटले होते. मात्र, त्याच दिवशी दक्षिण आफ्रिकेने ४३८ धावा करून क्रिकेटमधील 'अशक्य' हा शब्द कायमचा पुसून टाकला.

इंग्लंडची व्हाईट-बॉल क्रांती (४९८/५): २०१५ च्या विश्वचषकातील धक्क्यानंतर इंग्लंडने आपल्या मर्यादित षटकांच्या क्रिकेटला जी आक्रमक धार लावली, त्याचे फलित २०२२ मध्ये नेदरलँड्सविरुद्ध ४९८ धावांच्या विश्वविक्रमात दिसले. फिल सॉल्ट, डेविड मलान आणि जोस बटलर यांच्या शतकांनी वनडे क्रिकेटचे स्वरूपच बदलून टाकले.

भारतीय फलंदाजीचा सुवर्णकाळ (४१८/५): इंदूरच्या मैदानावर २०११ मध्ये विरेंद्र सेहवागने ठोकलेले द्विशतक (२१९) आणि भारताने वेस्ट इंडिजविरुद्ध उभारलेला ४१८ धावांचा डोंगर हा भारतीय क्रिकेटमधील वर्चस्वाचा सुवर्णक्षण होता.

३. टी-२० क्रिकेट: मर्यादांचे दहन आणि अनपेक्षित आकडे

टी-२० च्या सुरुवातीला १२० चेंडूंत २०० धावा करणे हे स्वप्नवत वाटायचे, पण आजच्या घडीला प्रत्येक षटकात सरासरी १२ ते १५ धावा काढणे ही सामान्य गोष्ट झाली आहे.

भारताचे २९७/६ आणि आक्रमकतेचा नवा अध्याय: बांगलादेशविरुद्ध हैदराबादच्या मैदानावर संजू सॅमसनचे वादळी शतक आणि भारताने वीस षटकांत कुटलेल्या २९७ धावा हे आधुनिक भारतीय टी-२० फलंदाजीच्या बेधडक शैलीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. चेंडूचा आदर करण्यापेक्षा सीमापार भिरकावून देणे हाच या नव्या पिढीचा विचार आहे.

झिम्बाब्वेचा अद्भूत विक्रम (३४४/४): या यादीतील सर्वांत थक्क करणारा आकडा म्हणजे झिम्बाब्वेने गॅम्बियाविरुद्ध टी-२० मध्ये उभारलेल्या ३४४/४ धावा. सिकंदर रझाचे ३३ चेंडूंत शतक आणि संपूर्ण संघाची तुफानी फटकेबाजी दर्शवते की, टी-२० फॉरमॅट आता पारंपरिक बलाढ्य संघांची मक्तेदारी राहिलेली नाही; योग्य दिवशी कोणताही संघ क्रिकेटच्या सीमा विस्तारू शकतो.

**आकडेवारीतील सामाजिक व तांत्रिक बदल**

हे आकडे केवळ धावा दर्शवत नाहीत, तर क्रिकेटच्या अर्थकारणातील आणि तंत्रज्ञानातील बदल अधोरेखित करतात. आजच्या घडीला अवजड बॅट, सपाट खेळपट्ट्या, लहान सीमा आणि 'पॉवर-हिटिंग'चे शास्त्रोक्त प्रशिक्षण यामुळे गोलंदाजांच्या चुकांना क्षमा उरलेली नाही.

कसोटीत जिथे ९०० धावा करायला तब्बल तीन दिवस लागायचे, तिथे टी-२० मध्ये संघ १२० चेंडूंत साडेतीनशे धावांच्या जवळ पोहोचत आहेत. लाल चेंडूच्या लालित्याकडून पांढऱ्या चेंडूच्या क्रूर वेगाकडे झालेला हा प्रवास मैदानावर फलंदाजांच्या वाढत्या प्रभावाची आणि गोलंदाजांच्या अस्तित्वाच्या लढाईची एक मार्मिक कहाणी सांगतो. शेवटी, आकड्यांचा हा महासागर एकाच गोष्टीची साक्ष देतो—क्रिकेटमध्ये अशक्य असे काहीच नाही, फक्त खेळपट्टीवर निर्भयपणे पाय रोवून उभे राहण्याची तयारी हवी.

- ९०९६३७२०८२

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची दुसरी यादी प्रसिद्ध

महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची दुसरी यादी दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून यादीत नागपूर जिल्ह्यातील ९ हजार ४९३ शेतकऱ्यांचा समावेश असल्याची माहिती सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक पंकज वानखेडे यांनी दिली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १२८ तर राष्ट्रीयीकृत बँकांच्या ९ हजार ३६५ शेतकरी सभासदांचा समावेश आहे.

राज्य शासनाने २जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित अथवा फेरपुनर्गठित कर्जासाठी २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने तयार केलेल्या योजना पोर्टलवर राज्यातील बँकांनी एकूण ३१ लक्ष १७ हजार रुपयांच्या थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. महाआयटीकडून संगणकीय संस्करण करण्यात आलेल्या माहितीनुसार राज्यातील १६ लाख ९६ हजार पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी २४ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या यादीतील आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांपैकी १२ लाख ५८ हजार पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात १० हजार ११५ कोटींची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांची दुसरी यादी ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत राज्यातील ३ लाख ५५ हजार शेतकऱ्यांचा आधार प्रमाणीकरणासाठी समावेश



करण्यात आला असून, त्यापैकी नागपूर जिल्ह्यातील ९ हजार ४९३ शेतकरी पात्र आहेत. पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दुसऱ्या यादीत समाविष्ट शेतकऱ्यांनी थकबाकीची खातरजमा करून नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. या यादीतील शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार असून, १ एप्रिलनंतरचे व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत. तर, राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांच्या काही शेतकऱ्यांची ३१ मार्च रोजीची कर्ज थकबाकी २ लाखांपेक्षा अधिक असली, तरी शासनाच्या 'हेअर कट' धोरणानुसार संबंधित कर्जखाती निरंक करण्यात येणार आहेत.

नागपूर जिल्ह्यातील पहिल्या यादीतील २३ हजार ९८४ पात्र लाभार्थ्यांपैकी १८ हजार ७४१ लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण केले असून त्यापैकी १५ हजार ८७६ लाभार्थ्यांच्या खात्यावर १६४ कोटी ६२ कोटी रुपयांचा लाभ त्यांच्या कर्जखात्यावर वितरित करण्यात आला आहे. तसेच उर्वरित लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण जलद गतीने करण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याचे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने कळविले आहे.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# एकाच मंदिरात श्री गणेशाच्या तीन रूपांचे दर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक (हर्ष कनोजे)**







महाराष्ट्राची अयोध्दा असलेल्या रामभूमी मध्ये विदर्भीय अष्टाविनायका पैकी एक अष्टविनायक श्री अठराभूजा गणेशाची मंदिर सुध्दा आहे. या पौराणिक इतिहास असलेल्या रामटेकचा रामायण काळाशी थेट संबंध सांगितला जातो. येथील रामगिरी तपोगिरी, सिंधुरागिरी टेकडीवरील श्रीराम जानकी आणि लक्ष्मणाची मंदिरे हा संबंध अधोरेखित करतात. प्रत्यक्ष मयार्दा पुरुषोत्तम श्रीरामचंद्रांनी येथे काही काळ विश्राम केला अन्-ही भूमी कृतकृत्य झाली. एव्हढेच नव्हे तर शंबुक मुनीचा वध करण्यासाठी श्रीरामाने एकदा रामगिरीवर आपले चरण ठेवले होते. मंदिरांचे आणि तलावांचे शहर असलेल्या या रामनगरीत टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या गणेश मंदिरात अठराभूजा असलेली वैदर्भीय अष्टविनायक श्री अठराभूजा गणेशाची अतिशय सुरेख व विलोभनीय मूर्ती आहे. या एकाच मंदिरात विघ्नहर्त्याची तीन रूपे भक्तांना पहावयास मिळतात.

**५०० वषार्पेक्षा प्राचीन इतिहास :** शहराच्या मध्यवस्तीत शास्त्री वार्डात गडाच्या पायथ्याशी अठराभूजा गणेशाचे मंदिर आहे. या मंदिराची व श्री गणेशाची कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. ५०० वषार्पेक्षा जास्त प्राचीन इतिहास असलेली व अठराभूजा असलेली ही मूर्ती विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव असावी. श्री अठराभूजा गणेशाची मुर्ती पांढऱ्याशुभ्र स्फटिकाची असून मूर्तीच्या अठराभुजा स्पष्टपणे दिसतात.

**एकाच मंदिरात श्री गणेशाच्या तीन रूपांचे दर्शन :** या मंदिराची अशी आख्यायिका आहे की, शैवल्य (तपोगिरी ) पर्वतावर श्री अठराभुजा गणेशाचे स्थान आहे. हा शैवल्य पर्वत म्हणजे शंबुक ऋषींचे आश्रयस्थान. या पर्वतावर विद्याधराची संस्कृती होती. अठरा विषयांचे ज्ञान असलेल्या विद्याधराची दृष्टीच अठराभुजा गणेशात आढळते. साडेचार फूट उंच पांढऱ्या स्फटिकाची ही मूर्ती आहे. या गणेशाच्या सोळा हातात अंकुश, पाश, त्रिशूल, परशू, धनुष्य आदी विविध अस्त्रे आहेत. एका हातात मोदक व दुसऱ्या हातात मोरपंखाची लेखणी आहे. श्री गणेशाची सोंड वेटोळी आहे. गणेशाच्या डोक्यावर पाच फनाधारी नाग असून गळ्यातही नाग आहे. कमरेला नागपट्टा आहे. अठरा सिध्दीमुळे गणेशास शास्त्र पुराणात विघ्नेश्वर म्हणूनही पूजन केले जाते. या मंदिरात मध्यभागी महागणपतीची तर उजव्या बाजुस रिद्धीसिद्धी गणेश तर डाव्या बाजुला श्री अठराभूजा गणेश आहेत. या एकाच मंदिरात श्री गणेशाच्या तीन रूपांचे दर्शन होऊन भाविक तृप्त होतात. चांद्रायन कुटुंबाकडून या मंदिराची निर्मिती झाली असावी. नागपुरचे चांद्रायण कुटुंब या मंदिराची व्यवस्था पूर्वी पाहात असत. आता श्री अठराभूजा गणेश मंडळाकडे व्यवस्था आहे. मात्र आजही अग्रपुजेचा मान चांद्रायण कुटुंबाकडेच आहे. श्री अठराभूजा गणेश मंडळाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. हुकुमचंद बडवाईक, विजय सलामे,सप्निल खोडे, धनराज बघेले. सुमित कोठारी, रितेश चौकसे, रवींद्र महाजन, गोलू महाजन, आणि इतर सदस्यगण मंदिरातील उत्सवाच्या आयोजनात व्यस्त आहेत. या अठराभूजा गणेशाची वैदर्भिय अष्टविनायक म्हणून गणना होते. त्याहीपेक्षा एकाच मंदिरात विघ्नेशाच्या तीन रूपांचे दर्शन होत.

## भरधाव अल्टो कारची समोरून दुचाकीला धडक, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

### पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दीतील



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी-सावनेर मार्गावर मौजा निंबा शिवार परिसरात रविवारी दुपारी ३ वाजता झालेल्या भीषण रस्ते अपघातात २७ वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालविणाऱ्या अल्टो कारने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमोल धनराज शेन्द्रे (वय २७, रा. चंद्रिकापूर चिंचवाडा, जि. छिंदवाडा, मध्य प्रदेश; हल्ली रा. बडोदा, ता. मौदा) हे मोटारसायकल क्रमांक एमएच ४० सीएल २८८० वरून सावनेरकडून पारशिवनीच्या दिशेने जात होते. त्याचवेळी पारशिवनीकडून सावनेरकडे जाणारी अल्टो कार क्रमांक एमएच ३२ एएच ८०१५ ही भरधाव वेगाने येत होती.

पारशिवनीपासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावर निंबा शिवारात दोन्ही वाहने समोरासमोर आल्यानंतर अल्टो कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे अमोल शेन्द्रे हे रस्त्यावर कोसळले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अहवालातून स्पष्ट झाले. या प्रकरणी सुनिल घनश्याम राउत (वय ४२, रा. करंभाड, वार्ड क्र. ३, ता. पारशिवनी) यांनी दिलेल्या तोंडी फियार्दीवरून पारशिवनी पोलिसांनी कारचालक रविंद्र विष्णु नगरारे (वय ५०, रा. चंद्रमणी नगर, नागपूर) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १०६(१) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी पुढील तपास पीएसआय पांडे यांनी सुरू केला आहे.

## जिल्हा शिक्षक पुरस्कार यादीला मंजुरीची प्रतीक्षा

**लातूर :** लातूर जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील गुणवंत शिक्षक, ग्रामपंचायत विभागातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांचा गौरव करण्यासाठी जिल्हा शिक्षक व ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण समारंभ २०२६ आयोजित करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता विश्व पॅलेस मंगल कार्यालय, डी. मार्ट रिंग रोड, लातूर येथे होणार आहे. गेल्या ५ वर्षांपासून पुरस्कार वितरण रखडले आहे. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाचे नियोजन झाले खरे. परंतु २०२६-२७ मध्ये देण्यात येणाऱ्या पुरस्कारार्थींच्या नावावर अद्याप विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी शिक्कामोर्तबच केलेले नाही.

## ताथवडे शाळेत विद्यार्थ्यांमध्ये एआय जागरूकता कार्यक्रम

### पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग निगडी यांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग निगडी येथील विद्यार्थ्यांकडून शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अक जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांसाठी वेबसाईट तयार करून त्याची माहिती त्यांना देण्यात आली.

यावेळी ऋतुजा पाटील, वैदेही जाधव, ओम काकड, रेवनसिद्ध गवळी यांनी विद्यार्थ्यांना अकतंत्रज्ञानाविषयी विविध प्रश्न विचारून बोलते केले. मग अध्ययनात आपण या तंत्रज्ञानाचा वापर कसा करू शकतो याची सखोल माहिती दिली. जेमिनी चॅट जीपीटी यांसारख्या माध्यमातून आपण अध्ययन अधिक सुखकर कसे करू शकतो याविषयी सांगितले. तसेच लॅपटॉप मोबाईल या साधनांद्वारे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना अध्ययन करताना त्याचा वापर कसा करावा याची माहिती दिली.

यावेळी मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी, कविता मोहिते, भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेकर, शिवप्रसाद गुट्टे, प्रिती चव्हाण आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. मारुंजी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश साबळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी संग्राम पाटील आणि गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी निवडून आलेल्या विद्यार्थी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. तर मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

## विभागीय मल्लखांब स्पर्धेसाठी जलालखेड्याच्या दोन विद्यार्थ्यांची झेप!

### जिल्हास्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत निशांत काटोले व मंथन राऊतची चमकदार कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**



एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूल, जलालखेडा येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. नागपूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेत शाळेच्या दोन विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावत विभागीय मल्लखांब स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या यशामुळे जलालखेडा परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागपूर येथील नूतन भारत महाविद्यालय, अभ्यंकर नगर येथे नुकतीच जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूलचा निशांत काटोले याने १४ वर्षे वयोगटात, तर मंथन राऊत याने १७ वर्षे वयोगटात दमदार प्रदर्शन करत तृतीय स्थान मिळविले. दोन्ही विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांची विभागीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

मल्लखांबासारख्या पारंपरिक भारतीय क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी दाखविलेली कौशल्यपूर्ण कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरली. नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे हे यश मिळाले असल्याचे सांगण्यात आले. विभागीय स्पर्धेतही उत्तम कामगिरी करून शाळेचे व परिसराचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

या यशाचे श्रेय निशांत काटोल व मंथन राऊत यांनी प्राचार्य शुभांगी अर्डक, शारीरिक शिक्षिका स्वाती गाखरे, पंकज ठाकरे तसेच आई-वडिलांना दिले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष रणजीत देशमुख, डॉ. आशिष देशमुख, सुधीर देशमुख, अमिशी अरोरा, गणेश ठवरे, मुकेश चोपडे, कुलदीप हिवरकर आणि प्राचार्य शुभांगी अर्डक यांनी अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## उत्तम ग्राहक सेवा, शंभर टक्के बिल वसुली आणि गळती रोखण्यासाठी महावितरणचे संचालक योगेश गडकरींचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



महावितरणचे ग्राहक हेच आपल्या सेवेचे मुख्य केंद्रस्थान असून त्यांना अखंडित व गुणवत्तापूर्ण सेवा देणे, वितरण आणि वाणिज्यिक हानी पूर्णपणे रोखणे तसेच वितरीत केलेल्या वीजबिलांची शंभर टक्के वसुली करणे या त्रिसूत्रीवर महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचा?यांनी मिशन मोडवर काम करावे, असे स्पष्ट निर्देश महावितरणचे संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी यांनी दिले आहेत.

नागपूर येथील महावितरणच्या 'विद्युत भवन' कार्यालयात नागपूर आणि अमरावती परिमंडळाची संयुक्त उच्चस्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विविध कामकाजाचा आणि धोरणात्मक उद्दिष्टांचा सविस्तर आढावा घेताना संचालक योगेश गडकरी बोलत होते.

बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना योगेश गडकरी यांनी वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण तातडीने करण्याच्या सूचना दिल्या. ते म्हणाले, "ग्राहकांना त्यांनी वापरलेल्या विजेचेच अचूक बिल गेले पाहिजे, याची सर्व यंत्रणांनी काटेकोर काळजी घेतली पाहिजे. ज्या ठिकाणी मीटरचे रिडिंग मिळत नाही किंवा मीटर नादुरुस्त (फॉल्टी) आहेत, ते मीटर तात्काळ बदलण्यात यावेत आणि त्या जागी अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवण्यात यावेत." तसेच, नवीन तंत्रज्ञानाबाबत ग्राहकांच्या मनात असलेल्या शंका व गैरसमज दूर करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी स्मार्ट मीटरच्या अचूकतेविषयी प्रत्यक्ष संवाद साधून जनजागृती करावी, असेही त्यांनी नमूद केले. वीज जोडणी मिळण्यास होणारा उशीर खपवून घेतला जाणार नसल्याचे सांगत गडकरी यांनी प्रलंबित असलेल्या नवीन वीज जोडण्या विनाविलंब त्वरित देण्याचे आदेश दिले. महावितरणच्या मानक कार्यपद्धतीनुसार ठरवून दिलेल्या वेळेत नवीन ग्राहकांना जोडणी मिळालीच पाहिजे. या कामात कोणतीही हयगय किंवा निष्काळजीपणा केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा सज्जड इशाराही त्यांनी यावेळी दिला.

चालू आर्थिक वर्षाअखेरीस महावितरणची वीज हानी एकेरी आकड्यावर आणण्याचे उद्दिष्ट त्यांनी दोन्ही परिमंडळांतील अभियंत्यांसमोर ठेवले.

वीज वितरणाची घडी अधिक मजबूत करण्यासाठी आणि महावितरणचा महसूल वाढवण्यासाठी आता आक्रमक पावले उचलली जाणार आहेत. वीजबिल न भरणाऱ्या थकबाकीदारांचा वीजपुरवठा नियमानुसार खंडित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासोबतच, वीज चोरीमुळे होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी विशेष शोध मोहीम तीव्र करा. वीजचोरीचे देयक मिळूनही भरणा न करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध थेट पोलीस गुन्हे दाखल केले जातील. स्मार्ट मीटर बसवलेले ग्राहक थकबाकीमुळे स्वयंचलित प्रणालीद्वारे बंद झाले असल्यास आणि तरीही बिल भरत नसतील, तर अशा प्रत्येक ग्राहकाच्या जागेवर जाऊन प्रत्यक्ष तपासणी केली जाईल. तिथे अनधिकृत वापर किंवा वीजचोरी आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

या बैठकीत योगेश गडकरी यांनी दोन्ही परिमंडळांतील वीजबिल वसुलीची स्थिती, लघुदाब गैरकृषी वीज विक्रीचे उद्दिष्ट आणि साध्य, 'पीसी झीरो' ग्राहकांचे बिलींग, जुन्या नॉन-स्मार्ट मीटर ग्राहकांचे सरासरी व अनियमित बिलींग, १० किलोवॉटपेक्षा जास्त क्षमता असलेल्या रुफटॉप सोलर ग्राहकांचे बिलींग, तसेच २० हॉर्स पॉवर किंवा त्याहून अधिक मंजूर भार असलेल्या उच्चदाब व लघुदाब कृषी ग्राहकांकडील थकबाकीचा सविस्तर आढावा घेतला. याशिवाय, नादुरुस्त वितरण रोहित्रांची (ट्रांसफॉर्मर) दुरुस्ती आणि 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' च्या प्रगतीची पाहणी करण्यात आली.

या बैठकीला मुख्य अभियंता (देयक व महसूल) मंगेश कोहाट, अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता (महसूल) स्वप्निल गोतमारे, प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे यांच्यासह दोन्ही परिमंडळांतील सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) आणि नागपूर परिमंडळातील विविध विभागांचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### जि.प. प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे तान्हा पोळा साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा**

जिल्हा परिषद प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे संध्याकाळी ४.३० वाजता उपसरपंच रविन्द्र ढोमणे , माजी सरपंच संदीप आंबिलढुके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श अंकुश निरगुळकर, उपाध्यक्ष प्रल्हाद वैद्य तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका कु.पठाण तबस्सुम, ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ गिर्हेपुंजे आणि पोलीस पाटील प्रशांत वाडीभस्मे, चंद्रमनी पाटील, राजाभाऊ देशमुख, ग्यानीवंत गिहेपुंजे, चरण वाडीभस्मे, संजय न्यायखोर, यांच्या उपस्थितीत एकत्रित सहभागातून तान्हा पोळा साजरा करण्यात आला. शाळा आणि अंगणवाडीतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला.

### गट ग्रामपंचायत पावडदौना अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये भव्य तान्हा पोळा उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

परंपरेचा उत्साह, संस्कृतीची जपणूक आणि गावकऱ्यांची एकजूट या सुंदर संगमात यंदाचे गट ग्रामपंचायत पावडदौना अंतर्गत येणाऱ्या पावडदौना, वांजरा, मोहखेडी या तिन्ही गावात भव्य तान्हा पोळा उत्साहात संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्व गावकरी तसेच शिवसेना तालुकाप्रमुख नितेश वांगे आणि मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तान्हा पोळ्याला बालगोपालांसह गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सजवलेल्या नंदीबैलांसोबत चिमुकल्यांचा उत्साह आणि संपूर्ण गावातील आनंदी वातावरणाने हा सोहळा अविस्मरणीय ठरला. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांच्या हस्ते नंदीबैलाचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गावातील ज्येष्ठ-श्रेष्ठ मान्यवर, पदाधिकारी, वडीलधारी मंडळी, महिला भगिनी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

### चाचेर येथील तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र संगम मोक्षधाम परिसर येथे उद्या ऋषी पंचमी उत्सव

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही चाचेर येथील श्री ऋषी महिला सेवा संस्था व ग्रामस्थ मंडळी तर्फे श्री क्षेत्र संगम मोक्षधाम परिसर चाचेर येथे ऋषी पंचमी उत्सव उद्या मंगळवार (ता. १५ सप्टेंबर)ला साजरा करण्यात येणार आहे. मंगळवार (ता. १५ सप्टेंबर)ला सकाळी ६ वाजता नागद्वार भक्तातर्फे नागद्वाराची महाआरती, सकाळी ९.३० वाजता वाणीभूषण ह भ प यश महाराज निंबाळकर ( आळंदी देहू जि. पुणे) मु. झुणकी सावळी ता. कळमेश्वर यांचे कीर्तन, श्री संत गजानन महाराजांची पालखी श्री भोजराज बावणे यांच्या राहत्या घरून निघून हरिनामाच्या गजराने श्री क्षेत्र संगम चाचेर येथे जाणार आहे. तरी सर्व भाविकांनी कार्यक्रम व महाप्रसादाच्या लाभ घेण्याचे आव्हान श्री ऋषी महिला सेवा संस्था अध्यक्ष तुळसा रेवा अढाऊ, उपाध्यक्ष सोनू संजय अढाऊ,सचिव छाया दिनकर कुल्लरकार, सहसचिव वनश्री विष्णू टेंभरे, कोषाध्यक्ष सुनंदा श्यामराव वानखेडे, सदस्य जयश्री राजेंद्र वानखेडे, कुसुम देवराव अढाऊ, ज्योत्सना शिवशंकर साखरवाडे, मीरा गजानन जांबुदकर, हिरा ज्ञानेश्वर टेंभरे, लक्ष्मी प्रभाकर आंबीलढुके, रेवा नामदेव अढाऊ, विष्णू नामदेव टेंभरे शिवशंकर साखरवाडे सह समस्त ग्रामस्थांनी केले आहे.



### खंडाळा( गांगनेर)येथे तान्हा पोळा उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही खंडाळा (गांगनेर)मध्ये तान्हा पोळ्याचे आयोजन हनुमान मंदिर जवळ करण्यात आले. याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला, लहान बालगोपाल, सरपंच, उपसरपंच, सदस्य उपस्थित होते. लहान मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले व प्रसाद देण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजन ओम नाथ, रोशन वाघमारे, वामन गडे,अमोल वाघमारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील सरपंच संकेत झाडे, उपसरपंच राष्ट्रपाल गजभिये, पोलीस पाटील सविता गजभिये,मुकेश अमृते,पंकज अमृते,लखन वाघमारे, प्रतिष्ठित नागरिक दत्ताजी वाघमारे, माधवराव श्रीरामे, नेहालसिंग तेहरिया व गावातील संपूर्ण लोक उपस्थित होते.

### महामार्गावर भरधाव वाहनाची धडक, चितळाचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

अर्जुनी-मोरगाव तालुक्यातील तावशी-संभाजीनगर महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत अंदाजे चार ते पाच वर्षे वयाच्या नर चितळाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (१३ सप्टेंबर) सकाळी सुमारे ११:३० वाजता सुमारास घडली. महामार्ग ओलांडताना भरधाव वाहनाची धडक बसल्याने चितळाचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वनविभागाने व्यक्त केला आहे. तावशी-संभाजीनगर महामार्गावर चितळ मृतावस्थेत पडून असल्याचे निदर्शनास आल्यानंतर घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावर न थांबता निघून गेला अज्ञात वाहनाचा शोध घेण्यात येत असून पुढील कारवाई वनविभाग करीत आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## जिल्हा परिषद आदर्श शाळा घोटमुंढरी येथे आनंददायी शनिवार उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांचा कौतुकास्पद कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

आज शनिवार (ता. १२ सप्टेंबर) ला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद आदर्श शाळा घोटमुंढरी येथे आनंददायी शनिवार आणि तान्हा पोळा निमित्त शाळेचे वतीने एक आगळावेगळा वेशभूषा, पोशाख,तान्हा पोळा पारंपारिक पद्धतीने तोरण,पताका लावून पूजन करून थाटामाटात वाजत गाजत प्रभातफेरी काढून करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद,शाळा व्यवस्थापन समिती,माजी विद्यार्थी संघ,पदाधिकारी,पालक आणि गावकरी यांचे हस्ते पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून शाळेचेवतीने नोटबुक, पेन, खाऊ,प्रसाद वाटप करून सर्व शिक्षक,शाळा व्यवस्थापन समिती आणि गावकऱ्यांच्या उपस्थितीत आनंददायी वातावरणात हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्राचे वेगवेगळे पोशाख पेहराव करून सादरीकरण केले आणि याप्रकारे कार्यक्रम पाहून सर्वांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.कार्यक्रम पाहून उपस्थित पाहुण्यांनी असे प्रेरणादायी कार्यक्रम होणे ही आजच्या काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला उपस्थित सर्वांचे शाळेचे सर्व शिक्षक,शाळा व्यवस्थापन समिती,माजी विद्यार्थी संघ,आजी माजी पदाधिकारी,पालक,गावकरी या सर्वांचे आभार मुख्याध्यापक विकास धारगावे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उदय पांडे यांनी मानले.

## श्री चक्रधर प्रभू अवतार दिन उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, टेकाडी (को. ख.)**

येथील महानुभाव पंथीय श्रीकृष्ण मंदिरात श्री चक्रधर प्रभू अवतार



दिन मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण मंदिर पंचकमेटीचे अध्यक्ष तथा माजी पोलीस पाटील पुंडलिकराव कुरळकर तसेच कार्यकारी अध्यक्ष गजानन फसाटे मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी मंदिरात पूजाअर्चा, आरती व भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री धनिरामजी राऊत यांच्या शुभ हस्ते दहिकाला फोडण्यात आला. प्रस्तुत कार्यक्रमास टेकाडी गावातील महानुभाव पंथीय भाविक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री चक्रधर प्रभूंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. त्यांच्या समता, मानवता व भक्तीच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. कार्यक्रमाचा समारोप महाप्रसादाने करण्यात आला. याप्रसंगी श्रीकृष्ण मंदिर पंचकमेटीचे सचिव विजय वासाडे यांनी उपस्थित संत महंत व सदभक्तांचे आभार मानले.

## मित्र परिवार, कान्होली आयोजित भव्य तान्हा पोळा उत्सव उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कान्होली**

मित्र परिवार, कान्होली यांच्या वतीने आयोजित भव्य तान्हा पोळा उत्सव २०२६ मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. या उत्सवात गावातील चिमुकल्या बालगोपालांनी आकर्षक वेशभूषा परिधान करून तसेच विविध प्रकारे नंदीबैल सजवून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला कार्यक्रमामध्ये सहभागी बालगोपालांना सायकल, ड्रेसिंग टेबल, ऑफिस टेबल, मिक्सर, कुकर, तसेच इतर मिळून ३० आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच सहभागी झालेल्या सर्व नंदीबैलांना शैक्षणिक साहित्य भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावाचे उपसरपंच मिलिंद रमेश कोवे, सदस्या दिपाली वलके, दिपाली करपाते, सुनीता वलके तसेच हेमंत बगवे, पांडुरंग कोवे, प्रदीप इटणकर, सचिन वलके, सागर कुलमथे, पांडुरंग वलके, विकास करपाते, गजानन खंडारे, अरविंद उईके, रवींद्र आडे, पुरुषोत्तम सलाम, प्रकाश दडमल, राकेश मडावी, संतोष कोवे, प्रशांत करपाते, नंदू कुमरे, अरविंद कोवे, भावेश वलके, मंगल कोवे, गौरव गोंडगे,राज कळंबे, तन्मय कोवे यांच्यासह मित्र परिवार आणि गावातील सर्व महिला बचत गट यांच्या मोलाच्या सहकायार्मुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थित ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक करत पुढील वर्षीही अशाच उत्साहात हा उत्सव साजरा करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## देवणी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा

**देवणी** : पावसाने पाठ फिरवल्याने देवणी तालुक्यातील खरीप हंगामातील सोयाबीन पिकाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी सोयाबीन पीक करपण्याच्या अवस्थेत आले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून देवणी तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी वगार्तून होत आहे. शेतकऱ्यांनी महागडे बियाणे, खते, कीटकनाशके तसेच मशागतीवर मोठा खर्च करून सोयाबीनची पेरणी केली. मात्र, अपेक्षित पाऊस न झाल्याने पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# मनपाच्या दहाही झोनमध्ये दररोज प्रत्येकी दहा किलोमीटर अतिक्रमण निर्मुलन कारवाई

## नियमांचे उलंघन करणाऱ्यांवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करणार, मनपा व पोलिसांच्या संयुक्त बैठकीत निर्णय

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरात वारंवार अतिक्रमण करून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईचा केली जाणार आहे. वारंवार अतिक्रमण करून नियमांचे उलंघन करणाऱ्यांवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा (कॉग्नेजेबल ऑफेन्स) आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक ('डॅमेज टू पब्लिक प्रॉपर्टी) कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले जाणार आहेत. तसेच मनपाच्या दहाही झोन मध्ये दररोज प्रत्येकी दहा किलोमीटर अतिक्रमण निर्मुलन कारवाई केली जाणार आहे. नागपूर महानगरपालिका आणि पोलीस प्रशासन संयुक्तपणे अनधिकृत बाजार, फूटपाथवरील अतिक्रमण, अनधिकृत वेंडर, अतिक्रमण करणारे दुकानदार तसेच वाहन मॉडिफाय करून त्यावर व्यवसाय करणाऱ्यांच्या विरोधात धडक मोहीम राबवणार असल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीसह वारंवार होणारे अतिक्रमण याविषयावर पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांच्या अध्यक्षतेत व मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस व मनपाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक रविवारी (ता.१३) जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. बैठकीस सहपोलीस आयुक्त श्री.



नवीनचंद्र रेड्डी, अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, मिलिंद मेश्राम, उपायुक्त मंगेश खवले यांच्यासह सर्व सहायक आयुक्त, पोलीस विभागाचे सर्व उपायुक्त प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीत पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी शहरात पार्किंग आणि रस्ता चौकांसाठी एक उत्तम आणि प्रभावी ब्लू-प्रिंट तयार करण्यात यावी. महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने फूटपाथवरील सर्व अतिक्रमण हटवून ते पूर्णपणे मोकळे करण्यात यावे, रस्त्यावरून चालणाऱ्या सामान्य नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात यावी, ई-रिक्षा आणि ऑटो-रिक्षा यांच्यासाठी विशिष्ट जागा निश्चित करण्यात यावी. तसेच रस्त्यावर सिलिंडर ठेवून धोकादायक पद्धतीने व्यवसाय करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

अतिक्रमण विरोधी कारवाई करताना प्रशासनाने कारवाई करण्यापूर्वी सर्वप्रथम अनधिकृत वेंडर्सना नियमांनुसार नोटीस देण्यात यावी. त्यांच्या बैठका घेऊन त्यांना संबंधित कारवाईची सूचना द्यावी, कोणतीही कारवाई करताना संबंधित स्थानिक पोलिस ठाण्याशी समन्वय साधावा, शाळा आणि महाविद्यालयांच्या १०० मीटर परिघात असणारे अवैध पानठेले आणि अतिक्रमणांवर तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी शहरातील पदपथांवरील अतिक्रमण हटवून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व मोकळे मार्ग निर्माण व्हावा आणि शहरी शिस्त प्रस्थापित होऊन नागरिकांच्या जीवनमान अधिक उंचवावे याकरिता नागपूर महानगरपालिका द्वारे राबविण्यात येत असलेल्या 'मिशन १०० डे' ची संपूर्ण माहिती देताना स्पष्ट केले की, पोलिस आणि मनपा प्रशासन पूर्ण समन्वयाने ही संयुक्त कारवाई करणार आहेत. या मोहिमेच्या सुरुवातीच्या टप्प्यात शहरातील मोठे चौक, अवैध मार्केट, फुटपाथ आणि रस्त्यांवरील प्रमुख अतिक्रमणांवर कारवाई केली जाणार असल्याचे आयुक्त डॉ. विपीन यांनी सांगितले.

## 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियानांतर्गत गणेश मंडळांच्या सहकार्याने आरोग्य व रक्तदान शिबिरांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्यासोबतच गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत श्री गणेशा आरोग्याचा अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत दि. १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या सहकार्याने समुदाय आरोग्य शिबिरे तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सहायता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, हैदराबाद हाऊस, नागपूर यांच्या समन्वयाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध आरोग्य सेवा, आरोग्य तपासणी, आजारांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच शासकीय आरोग्य योजनांबाबत माहिती देण्यात येणार आहे. या अभियानाच्या नियोजनाच्या अनुषंगाने मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या उपस्थितीत त्यांच्या कार्यालयात बैठक पार पडली. बैठकीस मनपाच्या सर्व झोनल वैद्यकीय अधिकाऱ्यांसह संबंधित वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी रक्तदान शिबिरांचे नियोजन, संबंधित रक्तपेढ्यांशी समन्वय, रक्तसंकलनाची व्यवस्था तसेच गणेश मंडळांच्या सहभागाबाबत सर्व झोनल वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात आले. हे उपक्रम नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे यांच्या प्रोत्साहनात्मक पाठिंब्यामुळे यशस्वीपणे राबविण्यात येणार असून, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर,यांच्या देखरेखीखाली राबविण्यात येणार आहे.

झोननिहाय रक्तपेढ्यांची व्यवस्था रक्तदान शिबिरांचे नियोजन नागपूर महानगरपालिकेच्या विविध झोननुसार करण्यात आले.

## प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये सृजनशीलतेचा उत्सव

### आंतरशालेय पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रोटरी क्लब ऑफ नागपूर व प्रहार मिलिटरी स्कूल, रवी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरशालेय पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती स्पर्धेचा उत्साहात समारोप झाला. तीन दिवसीय या स्पर्धेत शहरातील ३१ शाळांमधील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत शाडू माती, नैसर्गिक रंग व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या.

बाप्पा मोरयाच्या जयघोषात झालेल्या पारितोषिक वितरण समारंभास प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, एनआयटी नागपूरचे सुप्रिटेंडिंग इंजिनियर प्रशांत भांडारकर, चित्रकला महाविद्यालयाचे प्रोफेसर व परीक्षक संजीव जठार, अजय रायबोले, रोटरी क्लब एलिटच्या प्रेसिडेंट स्वप्ना नायर, माजी अध्यक्ष ममता जयस्वाल, शाळेचे उपाध्यक्ष भालचंद्र कागभट तसेच रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारत कला, सृजनशीलता आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश दिला. परीक्षक अजय रायबोले व संजीव जठार यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले. गट अ मध्ये देवांशी असकार (सरस्वती विद्यालय) प्रथम, अहान चौहान (बी.के.व्ही.व्ही. स्कूल) द्वितीय तर रौनक चंद्रशेखर (राही सेंट्रल स्कूल) तृतीय ठरले. पंखुडी सिंग, पायल चांदपुरकर व कव्यांशा धापोडकर यांना प्रोत्साहनपर पुरस्कार मिळाला. गट ब मध्ये हर्ष टोंगे (हडस हायस्कूल) प्रथम, ओझल बेदबावरे (सीडीएस स्कूल) द्वितीय आणि रोशन भुसारे (सोमलवार हायस्कूल, रामदास



पेठ) तृतीय ठरले. साची रानदिवे, इशिका भोंडे व स्वरा बनिया यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आले. गट क मध्ये दीता अकनुरवार (हडस हायस्कूल) प्रथम, श्रावणी कालेश्वर (राजेंद्र हायस्कूल, महाल) द्वितीय तर सायली बिसेन (राही पब्लिक स्कूल) तृतीय ठरल्या. गौरव बांदे, आरव कनोजिया व नजर वरखडे यांना प्रोत्साहनपर पुरस्कार मिळाले.

प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे विशेष कौतुक करत पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजाला महत्त्वपूर्ण संदेश दिल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते, असेही त्यांनी नमूद केले. शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी यांनी सर्व विजेते व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रीता चौधरी यांनी केले. उपस्थितांनी सामूहिकरित्या वंदे मातरम्‌चे गायन करून कार्यक्रमाची सांगता केली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी वैशाली भुसारी व मंजुषा वैरागडे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे संपूर्ण स्पर्धा शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

## जागतिक प्रथमोपचार दिनानिमित्त जनजागृतीपर उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

जिल्हा परिषद शाळा तोंडली येथे जागतिक प्रथमोपचार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रथमोपचाराचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून देण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा धूर्डे यांनी विद्यार्थ्यांना प्रथमोपचाराचे महत्त्व व आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. प्रथमोपचार पेटीतील विविध साहित्याची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली. तसेच त्या साहित्याची एक्सपायरी डेट तपासणे, साहित्याचा योग्य वापर करणे आणि प्रथमोपचार करताना आवश्यक ती काळजी घेणे याबाबत माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी स्वतः प्रथमोपचाराचे विविध प्रात्यक्षिके करून पाहिली. त्यामुळे केवळ माहिती न घेता प्रत्यक्ष कृतीतून प्रथमोपचाराच्या पद्धती विद्यार्थ्यांना समजल्या.आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचारानंतर रुग्णाला तातडीने रुग्णालयात नेण्यासाठी आवश्यक असणारे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमास सहाय्यक शिक्षक निलेश जाधव तसेच संपूर्ण विद्यार्थी उपस्थित होते. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीत प्रसंगावधान राखणे, योग्य प्रथमोपचार करणे आणि स्वतःसह इतरांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे याबाबत जागरूकता निर्माण झाली.

# कॅन्सरच्या काळोखात मदतीचा हात : पतीला नवजीवन मिळताच सोनाली भुरसेंनी बांधली भावाची राखी

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे )**

कुटुंबावर अचानक कॅन्सरसारखे संकट कोसळले आणि जगण्याची आशाच धूसर झाली. पतीच्या उपचारांची चिंता, आजाराचे गांभीर्य आणि पुढे काय होणार, या प्रश्नांनी सोनाली मुकुंदा भुरसे यांचे कुटुंब अस्वस्थ झाले होते. अशा कठीण प्रसंगी मदतीचा हात पुढे आला आणि निराशेच्या अंधारात आशेचा किरण दिसला. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात मुकुंदा भुरसे यांच्या उपचाराची व्यवस्था करण्यासाठी मदत केली. यशस्वी शस्त्रक्रियेनंतर मुकुंदा भुरसे सुखरूप घरी परतले आणि भुरसे कुटुंबाला जणू नवजीवनच मिळाले.




या मदतीची कृतज्ञता मनात साठवून ठेवलेल्या सोनाली भुरसे यांनी पोंभूर्णा येथील एकल महिला संमेलनात आ.

सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेतली. डोळ्यांत कृतज्ञतेचे भाव आणि मनात भावनेचा सागर घेऊन त्यांनी आ. मुनगंटीवार यांचा सत्कार केला. त्यानंतर त्यांच्या हातावर राखी बांधली. त्या राखीच्या धाग्यात केवळ एक सणाची औपचारिकता नव्हती, तर संकटाच्या काळात साथ देणाऱ्या भावाबद्दलचा विश्वास, माणुसकी आणि आयुष्यभराची कृतज्ञता दडलेली होती. हा क्षण पाहताना उपस्थितांचेही मन हेलावून गेले.

सुमारे तीन महिन्यांपूर्वी मुकुंदा भुरसे यांना कॅन्सरचे निदान झाले. एका क्षणात संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्याला अनिश्चिततेने वेढले. उपचार कुठे करायचे, खर्च कसा भागवायचा आणि पतीला या संकटातून कसे बाहेर काढायचे, या चिंतेने सोनाली भुरसे यांच्यासह कुटुंबीय व्याकूळ झाले होते. अशा वेळी आ. मुनगंटीवार यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात उपचाराची व्यवस्था होऊन शस्त्रक्रिया यशस्वी झाली. आज मुकुंदा भुरसे सुखरूप असल्याने कुटुंबाच्या आयुष्यात पुन्हा आनंद परतला आहे.

पतीच्या आयुष्यासाठी सुरू असलेल्या संघर्षात मिळालेली ही मदत सोनाली भुरसे यांच्या मनात कायमची कोरली गेली. त्यामुळे आभार मानण्यासाठी शब्द अपुरे पडले आणि त्यांनी राखीच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. आ. मुनगंटीवार यांच्या हातावर बांधलेली ती राखी संकटाच्या काळात निर्माण झालेल्या विश्वासाच्या नात्याची साक्ष ठरली.

या प्रसंगाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मदत करताना कोणत्याही राजकीय भेदाची अडचण आली नाही. संकटात सापडलेल्या कुटुंबाच्या मदतीला माणुसकीच्या भावनेतून धावून जाणे, हीच खरी लोकसेवा असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले. एखाद्याच्या कठीण काळात दिलेला आधार त्याच्या संपूर्ण कुटुंबासाठी आयुष्यभराची आठवण बनतो, याची प्रचिती या प्रसंगातून आली.

एकल महिला संमेलनात आ. मुनगंटीवार यांनी संकटात असलेल्या महिलांच्या पाठीशी भाऊ म्हणून उभे राहण्याचा विश्वास व्यक्त केला. त्याच कार्यक्रमात सोनाली भुरसे यांनी पतीच्या उपचारासाठी मिळालेल्या मदतीची कृतज्ञता व्यक्त करत त्यांना राखी बांधली. त्यामुळे त्यांच्या संदेशाला भावनिक आणि जिवंत स्वरूप प्राप्त झाले

एका बाजूला कॅन्सरचे संकट, दुसऱ्या बाजूला पतीला वाचविण्यासाठी सुरू असलेली धडपड आणि या संघर्षात मिळालेला मदतीचा हात या सगळ्या भावनांचा संगम पोंभूर्ण्यात पाहायला मिळाला. पतीला नवजीवन मिळाल्याचा आनंद आणि त्या आनंदामागे उभ्या राहिलेल्या मदतीबद्दलची कृतज्ञता सोनाली भुरसेंच्या राखीतून व्यक्त झाली. संकटाच्या काळात धरलेला मदतीचा हात आणि त्यातून निर्माण झालेले माणुसकीचे नाते किती अनमोल असते, याचा हृदयस्पर्शी अनुभव या प्रसंगाने दिला.

थोडक्यात

## ग्रा. पं चाचेर कार्यालयात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

ग्रामपंचायत चाचेर येथे महानुभाव पंथाचे संस्थापक आणि थोर तत्त्वज्ञ सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांची ८०६ वी जयंती साजरी करण्यात आली. सरपंचा लूंबिनी महेश कलारे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच रविंद्र ठाकरे, ग्रा.पं. सदस्य शैलेश कोपरकार , पोलीस पाटील ज्ञानेश्वर नाकाडे, तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश काळे, माजी सरपंच महेश कलारे, क्रिष्णा खडसे, किसना नागमोते, चुडामन हुमणे, सानिदेओल काळे, देवेंद्र खडसे, राकेश काळे, प्रल्हाद काळे, रोहित काळे,नितीन नागमोते, उमेश झलके, रामानंद खडसे,शेखर ठाकरे,प्रवीण मोहोळ, अंगणवाडी सेविका पुष्पा बिसने, रंजना नगरे, इंदु मनगटे व गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## तान्हापोळा म्हणजे लहानग्यांची कृषिसंस्कृतीशी ओळख : प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त'



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गोन्हीसिम, साईनगर, दिघोरी नाका येथे तान्हापोळा हर्षोल्लासात पार पडला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. महादेव बावणे, प्रमुख अतिथी प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त', तर निरंजन गायकवाड, गिरीधर चौके याची विशेष उपस्थिती होती. यावेळी नंदीबैलाची सजावट व बालकांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. नंदीबैल सजावटीत प्रथम- मनप्रीत सोमकुवर, द्वितीय- अंशू बावणे, तृतीय- दिव्यांश वैद्य तर वेशभूषेत प्रथम- सिया वाखतकर, द्वितीय- नितारा कुरुडकर, तृतीय- मैत्री गवळी यांना पारितोषिके देण्यात आली.

तान्हापोळ्याला संबोधताना कवी प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' म्हणाले की, 'आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे. बैलजोडीच्या व शेतक-यांच्या मेहनतीने अन्नधान्याची भरभराट होते. आपले पोषण होते. यांच्या उपकाराची व श्रममूल्याची लहान मुलांना ओळख व्हाणे; गरजेचे आहे. तसेच तान्हापोळ्याने बालमनाचे मनोरंजन व उद्बोधन व्हावे; हाही हेतू यातून साध्य होतो.' लहान मुलांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक मेश्राम यांनी केले तर आभार अमोल राघोर्ते यांनी मानले. यावेळी नगरसेविका मनीषा सतीश यादव, शंकर लेपसे, सतीश यादव, देवीदास भक्ते तसेच बहुसंख्येने पालकवर्ग उपस्थित होता.

## साई मंदिर परिसरात तान्हा पोळा उत्साहात

### शिवशंकर, राधा, छत्रपती शिवाजी महाराज, शेतकरी, वारकरी आदींचा वेषभूषा धारण केलेल्या चिमुकल्यांनी आणली रंगत



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

बैल पोळ्याचा दुसरा दिवस म्हणजेच पाडवा आणी तान्हा पोळा या दिवशी घरातील लहान बच्चु मंडळीची आपल्या लाकडी बैलाला सजवून पोळ्यात नेण्याची धामधूम यात सर्व पालकवर्गार्ची चांगलीच दमछाक होते. अश्याच आपल्या चिमुकल्यांची वेषभूषा नवीन परिधान व त्यांच्या सजलेला लाकडी नंदी घेऊन पोळ्यात पोहचण्याची लगबग बघण्यासारखी असते व सायंकाळ होताच शहरात ठिकठीकाणी या पारंपरिक तान्हा पोळ्याचे आयोजन भव्यतेने केल्या जाते. असेच भव्य आयोजन शहरातील साई मंदिर परिसरात साई मंदिर व्यवस्थापन मंडळी तर्फे करण्यात आले या आयोजनाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक चुडामन धुंदे तर प्रमुख उपस्थितीत साई मंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष रामभाऊ मोवाडे, नगरसेविका सुचिताताई बापू सुरे, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर ढुंढेले, समाजसेवी संजय मानकर, प्रकाश बुटे, निलेश चेटुले आदिंच्या उपस्थितीत शेकडो चिमुकले व त्यांच्या पालकवर्गाच्या समावेत संपन्न झाला.यात आकर्षक नंदी सजावट, आकर्षक वेषभूषा, आकर्षक परिधान असे प्रथम, व्दितीय व त्रितीय असे रोख बक्षीस व प्रत्येक गटात अनेक रोख प्रोत्साहन बक्षीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यात सुंदर नंदि सजावट या गटात प्रथम यथार्थ निंबाळकर, व्दितीय हितार्थ मंगरूले व तीसरा क्र.ताजने यांनी पटकावले तर वेषभूषा गटात प्रथम साई चांदुरकर,व्दितीय गिरीषा नेरकर,तीसरा क्र.पथमेश ठवकर यांनी पटकवला,तर पुर्वीत कडू, दिव्यांशू वानखडे, कुशल गोसवी, प्रीयांश बंभोरे, रितीशा मिरासे, आनंदी धात्रक, नायरा अग्रवाल, प्रज्ञा भैसारे, रियांश रहकवार, बंसींक सोलंकी, कियारा गुप्ता, प्रताप कांबडे, हिमानी नगारे व नित्या परतेकी यांना रोख प्रोत्साहन बक्षीस देण्यात आली. आयोजनाच्या यशस्वीते करीता प्रशांत थोटे,ज्ञानेश्वर बोराडे, अरविंद वानखडे, खाटीक सर कुंदा ठाकरे मंदाबाई गाखरे ज्ञानेश्वर निंबाळकर, निलेश सोलंकी सहीत परिसरातील सर्व युवक मंडळी व साई मंदिर विश्वस्त कमेटीने परिश्रम घेतले.तर पर्यवेक्षक म्हणून कुंदाताई ठाकरे, मंदाताई गाखरे व रमाताई पडोळे यांनी कार्य सांभाळले.

# डी.जे. बंदीसाठी भर पावसात मूक मार्च

### सर्वधर्मीय धर्मगुरू, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह विविध संघटनांचा उत्स्फूर्त सहभाग




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डी.जे.चा वापर कायमस्वरूपी बंद करावा आणि ध्वनिप्रदूषणा संदर्भातील न्यायालयीन निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी सुरू करण्यात आलेल्या जनचळवळीचा आणखी एक टप्पा म्हणून रविवारी नागपुरात मूक मार्चचे आयोजन करण्यात आले. भर पावसातही या मार्चला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध धर्मांचे धर्मगुरू, ज्येष्ठ नागरिक, महिला, महाविद्यालयीन विद्यार्थी, रुग्णालयातील कर्मचारी तसेच विविध सामाजिक व स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मोर्चात माजी आमदार तथा माजी महापौर संदीप जोशी, TRAW चे नितीश चौधरी, फादर जोसेफ, भंते प्रज्ञानंद महाथेरो, इमाम आतिक कुरेशी, आय.एम. ए. महाराष्ट्राच्या अध्यक्ष डॉ. मंजुषा गिरी, सी. ए.जी. नागपूरचे विवेक रानडे, विष्णू मनोहर, क्रीडा प्रतिनिधी अशफाक शेख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले. मुस्लिम, खिश्चन, बौद्ध आणि हिंदू धर्मगुरूंची उपस्थिती हे या आंदोलनाचे विशेष वैशिष्ट्य ठरले. कोणत्याही धर्माला, उत्सवाला अथवा राजकीय पक्षाला विरोध नसून ध्वनिप्रदूषणापासून नागरिकांना मुक्ती मिळावी, हा या जनचळवळीचा मुख्य उद्देश असल्याचा संदेश मोर्चातून देण्यात आला.

मोर्चात सहभागी नागरिकांनी तोंडावर पट्ट्या बांधून मूकपणे आपली भूमिका मांडली. 'न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करा', 'भविष्यात डी.जे. कायमस्वरूपी बंद करा', 'आमचा कोणत्याही धर्माला, उत्सवाला किंवा राजकीय पक्षाला विरोध नाही', अशा आशयाचे फलक सहभागींच्या हातात होते. घोषणाबाजी न करता शांततेच्या मार्गाने नागरिकांनी आपला आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविला. या मूक मोर्चाचे आवाहन ळफअह या संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. त्याला CAGF, Indian Medical Association, Together We Can, Dr. Babasaheb Ambedkar Institute of Management Studies, ज्येष्ठ नागरिक मंडळ, विविध सायकलिंग क्लब यांसह अनेक सामाजिक संस्था, संघटना आणि विद्यार्थी संघटनांनी पाठिंबा दिला. डी.जे.च्या अतितीव्र आवाजामुळे केवळ ध्वनिप्रदूषणच होत नसून त्याचा परिणाम ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे हा विषय कोणत्याही धमार्शी किंवा उत्सवाशी जोडण्याऐवजी नागरिकांच्या आरोग्याचा, शांततेचा आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न म्हणून पाहावा, अशी भूमिका जनचळवळीचे नेतृत्व करणार माजी आमदार, माजी महापौर संदीप जोशी यांनी यावेळी मांडली.न्यायालयाने ध्वनिप्रदूषणा संदर्भात दिलेल्या निर्देशांचे प्रशासनाने कठोरपणे पालन करावे आणि डी.जे.वरील बंदी कायमस्वरूपी लागू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मार्च मध्ये राजेश दाचेवार, तुषार कोठारी, प्रवीण मोहोड़, सचिन असवार, विवेक वैद्य आदी सहभागी झाले होते. या जनचळवळीत सहभागी झालेल्या सर्व संघटना, धर्मगुरू, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रुग्णालयातील कर्मचारी आणि नागपूरकरांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

## सचिन चव्हाण यांच्या कविता आकाशवाणीवर, 'विभावरी' मालिकेचे उद्या प्रसारण



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** येथील सुप्रसिद्ध साहित्यिक सचिन चव्हाण यांच्या स्वरचित हिंदी कवितांचे वाचन नुकतेच आकाशवाणी नागपूर केंद्रावर रेकॉर्ड करण्यात आले होते . उद्या आकाशवाणी नागपूरच्या लोकप्रिय 'विभावरी' या मालिकेतून त्यांच्या कविता हिंदी दिवस निमित्त ' जन जन की भाषा हिंदी ' मध्ये काव्यवाचन सकाळी ११.३० वाजता प्रसारित होणार आहेत.

निसर्ग, पर्यावरण, व्यसनमुक्ती, युवकांमध्ये आत्मविश्वास जागविणे, वेळेचे महत्त्व तसेच प्रेरणादायी विचार अशा विविध विषयांना त्यांच्या कवितांमधून प्रभावी अभिव्यक्ती मिळाली आहे. सामाजिक जाणीव आणि सकारात्मक संदेश देणाऱ्या या कविता श्रोत्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहेत.कवी, कथाकार, ललित लेखक, स्तंभलेखक, पक्षीमित्र , गीतकार व शिक्षण अभ्यासक म्हणून सचिन चव्हाण परिचित आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय साहित्यिक यशाबद्दल साहित्य, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नगर परिषद, सावनेरचा सुप्त उपक्रम, सार्वजनिक गणेशोत्सव पर्यावरण स्नेही बाप्पा स्पर्धा-२०२६

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

नगर परिषद सावनेर तर्फे माझी वसुंधरा अभियान ६.० व स्वछ भारत अभियान अंतर्गत पर्यावरण स्नेही बाप्पा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सावनेर शहरातील गणेश मंडळानी सहभागी व्हावे.असे आव्हान नगराध्यक्षा संजनाताई मंगळे तसेच मुख्याधिकारी अर्शीया जुही यांनी केले आहे. सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची पुरस्कारासाठी निवड पुढील निकषांच्या आधारे करण्यात येईल. गुणांकनासाठी बाब सांस्कृतिक कार्यक्रम / स्पर्धांचे आयोजन (प्रत्येकी २ गुण),गायन वादन नृत्य नाट्य लोककला आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कला हस्तकला चित्रकला, शिल्पकला माहितीपट / चित्रपट, संस्कृतीचे जतन / संवर्धन (प्रत्येकी २ गुण) १०, संस्कृती संवर्धनासाठी अभिनव उपक्रम पारंपारिक नाणी/शस्त्र/भांडी ह. संग्रहांचे प्रदर्शन, साहित्य विषयक उपक्रम लूप्त होणा-या कलाविष्कारांचे संवर्धन १. राज्यातील गडकिल्ले यांचे जतन व सर्वर्थन (५ गुण),२. राष्ट्रीय/राज्य स्मारके, धार्मिक स्थळांविषयी जन जागरुकता, जतन व संवर्धन (५ गुण), सामाजिक उपक्रम (प्रत्येकी २ गुण), महिला सक्षमीकरण पर्यावरण टॅक्षण वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार व प्रसार व्यसनमुक्ती/अंधश्रध्दा निर्मूलन / सामाजिक सलोखा ज्येष्ठ नागरीकांसाठी उपक्रम आरोग्यविषयक उपक्रम शैक्षणिक उपक्रम, कृषीविषयक उपक्रम आधुनिक तंत्रज्ञानाची जनजागृती वंचित घटकांसाठी उपक्रम,. कायमस्वरुपी सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या सार्वजनिक गणेशमंडळांना ५ गुण देण्यात येतील. उदा. सार्वजनिक गणेश मंडळांकडून कायमस्वरुपी रावविण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा, ग्रंथालय,वृध्दाश्रम, एखादे गाव दत्तक घेणे व इतरसामाजिक सेवा,पर्यावरणीय शिल्पकला, पर्यावरणपुरक सजावट (थमाकोल / प्लास्टीक विरहीत),ध्वनीप्रदुषण रहित वातावरण, पारंपारिक / देशी खेळांच्या स्पर्धा, गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा (प्रत्येकी २ गुण), पिण्याच्या पाण्याची सोय प्रसाधनगृह वैद्यकीय प्रथमोपचार वाहतुकीस अडथळा येणार नाही असेआयोजन / आयोजनातील शिस्त परिसरातील स्वच्छता इत्यादी निकष ठेवण्यात आले असुन त्या आधारे गुण प्रदान करण्यात येणार आहे



**स्पर्धेचे बक्षिसे -** सार्वजनिक गणेशोत्सव पर्यावरण स्नेही बाप्पा स्पर्धा २०२६ मधे प्रथम पुरस्कार २१,००१/- रोख,व्दितीय पुरस्कार ११,००१/- रोख,तृतीय पुरस्कार ७००१/- रोख असे राहणार असुन यात वेळ पडल्यास प्रोत्साहन बक्षीसांची भर पडणार असल्याचे बोलल्या जात आहे. स्पर्धेचा कालावधी १४/०९/२०२६ पासून. २५/०९/२026 असा असुन सदर स्पर्धेत आपला सहभाग नोंदविण्याकरिता व स्पर्धेबाबत अधिक माहिती करिता आरोग्य विभाग, नगर परिषद सावनेर कार्यालय येथे संपर्क साधावा, अशी विनंती सावनेर नगरपालिकेच्या अध्यक्षा संजनताई मंदार मंगळे, नगर परिषद, सावनेर-उपाध्यक्ष भीमराव उर्फ राजूभाऊ घुगल नगर परिषद सावनेर.- मुख्याधिकारी अर्थिया जुही नगरपरिषद सावनेर यांनी केली आहे.

# कुटुंबाला मिळाला हरवलेला किशन

## एका मिसिंग पोस्टने उलगडले किशनच्या मृत्यूचे गूढ

### ९ दिवसांनी कुटुंबीयांपर्यंत पोहोचली बातमी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर/नागपूर**

सावनेर येथील सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका मिसिंग पोस्टमुळे तब्बल काही दिवसांपासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीची ओळख पटण्यास मदत झाली. दुर्दैवाने किशनचा मृत्यू झालेला असला, तरी त्याच्या कुटुंबीयांना त्याच्याबाबत सत्य माहिती मिळवून देण्यात या पोस्टची महत्त्वाची भूमिका ठरली.

किशन प्रसाद कश्यप (वय ३१), रा. WCL कॉलनी, सावनेर, जि. नागपूर हा १८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता नागपूर येथील मोदी नंबर २, कृष्णा दुकानाजवळ, सीताबर्डी परिसरातून बेपत्ता झाला होता. नातेवाईकांनी सीताबर्डी पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद केली. तसेच नातेवाईकांनी स्वतःही किशनचा बराच शोध घेतला; मात्र त्याचा ठावठिकाणा लागत नव्हता. यानंतर नातेवाईकांनी सावनेर येथील सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्याशी संपर्क साधून किशनबाबत माहिती दिली. हितेश बनसोड यांनी २४ ऑगस्ट २०२६ रोजी किशनची मिसिंग पोस्ट तयार करून ती सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित केली.ही पोस्ट सोशल मीडियाच्या माध्यमातून नागपूर अजनी पोलीस ठाण्यात कार्यरत रुक्सार शेख यांच्यापर्यंत पोहोचली. रुक्सार शेख यांनी ही पोस्ट महत्त्वाची माहिती म्हणून जपून ठेवली.

दरम्यान, किशन पायी रामटेकच्या दिशेने निघून गेला होता. २२ ऑगस्ट २०२६ रोजी त्याला एका वाहनाची धडक बसून डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत देवलापार पोलिसांनी त्याला नागपूर मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यावेळी किशनने पोलिसांना स्वतःचे नाव किशन प्रसाद एवढे सांगितले आणि त्यानंतर तो बेशुद्ध झाला. मेडिकल



हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर उपचार सुरू होते. मात्र २ सप्टेंबर २०२६ रोजी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्याचा अंत्यविधी केला. दरम्यान, तब्बल काही दिवसांनंतर किशनची शोधपत्रिका रुक्सार शेख यांच्यापर्यंत पोहोचली. त्यांच्या जवळ जपून ठेवलेल्या हितेश बनसोड यांच्या मिसिंग पोस्टमधील किशनचे नाव आणि शोधपत्रिकेतील माहिती यामध्ये साम्य असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

रुक्सार शेख यांनी तात्काळ हितेश बनसोड यांच्याशी संपर्क साधून ही माहिती दिली. त्यानंतर हितेश बनसोड यांनी किशनच्या नातेवाईकांशी संपर्क साधून माहितीची खात्री केली. नातेवाईकांनी किशनची ओळख पटविल्यानंतर त्यांनी तात्काळ देवलापार पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी आवश्यक माहिती देत घटनाक्रमाबाबत त्यांना मार्गदर्शन केले. किशन जिवंत नसल्याची बातमी कुटुंबीयांसाठी अत्यंत दुःखद होती; मात्र अनेक दिवसांपासून बेपत्ता असलेल्या आपल्या व्यक्तीबाबत अखेर सत्य समोर आल्याने कुटुंबीयांनी हितेश बनसोड यांचे आभार मानले. या घटनेमुळे सोशल मीडियाचा जबाबदारीने आणि सकारात्मक पद्धतीने वापर केल्यास तो एखाद्या कुटुंबासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. एका पोस्टने किशनला परत आणता आले नाही; पण त्याच्या कुटुंबाला त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग नक्कीच दाखवला. असे मत हितेश बनसोड सामाजिक कार्यकर्ता, सावनेर यांनी व्यक्त केले.

# प्रमोद बोडखे यांना विभागस्तरीय गुरुरत्न पुरस्काराने सन्मानित

### औदुंबर बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्थेतर्फे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याची दखल

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

शैक्षणिक गुणवत्तावाढीसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे आणि शाळा व समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करणारे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, जुनापाणी येथील शिक्षक तथा प्रभारी मुख्याध्यापक प्रमोद संपतराव बोडखे यांना विभागस्तरीय 'गुरुरत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. आपल्या २८ वर्षांच्या शैक्षणिक सेवेत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व विद्यार्थीहिताच्या कायार्ची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली.

विदर्भातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा या वेळी गौरव करण्यात आला. डॉ. वसंतराव देशपांडे मेमोरियल हॉल, सिव्हिल लाईन, नागपूर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार विकास ठाकरे यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सुधाकर कोहळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ जोध, शिक्षक नेते अनिल शिवणकर आणि हरीश अरोरा उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन भाग्यश्री पवार व मनोज कुंभारे यांनी केले.



नियुक्तीनंतर शिक्षकांनी वाढविलेली शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, शाळेसाठीचे योगदान, विद्यार्थ्यांकरिता केलेले विशेष कार्य, विविध नवोपक्रम, सामाजिक व पर्यावरण संवर्धनात्मक कार्य, विशेष गरजा असलेल्या तसेच शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी केलेले प्रयत्न, अशा विविध निकषांच्या आधारे हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्ययन निष्पत्ती आणि शाळेविषयी पालकांचा विश्वास वाढविण्यासाठी प्रमोद बोडखे यांनी विशेष प्रयत्न केले. शाळेच्या विकासासाठी पालक, ग्रामस्थ व समाजातील विविध घटकांचा लोकसहभाग मिळवून घेण्यावर त्यांनी भर दिला. उपलब्ध साधनसामग्रीचा प्रभावी वापर करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच शाळेतील वातावरण अधिक आनंददायी व विद्यार्थीकेंद्री करण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला.

प्रमोद बोडखे यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शाळेच्या चार भिंतींपलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जपली. वृक्षारोपण, पर्यावरणसंवर्धन, स्वच्छता व जनजागृतीपर उपक्रम तसेच विविध राष्ट्रीय व सामाजिक कार्यक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देत त्यांच्यामध्ये संवेदनशील व जबाबदार नागरिकत्वाचे संस्कार रुजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

विशेष म्हणजे, शिक्षक दिनी जिल्हा परिषद, नागपूरच्या वतीने प्रमोद संपतराव बोडखे यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला. त्यानंतर याच वर्षी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना विभागस्तरीय 'गुरुरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामुळे काटोल तालुक्यासह संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडविण्यासोबतच समाजाशी नाते जोडून जबाबदार नागरिक घडविण्याच्या त्यांच्या कायार्ला 'गुरुरत्न' पुरस्काराच्या रूपाने मिळालेली ही पावती निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे.

थोडक्यात

## खापरखेड्याच्या मुख्य मार्गावर पोळ्याचा जल्लोष

### सजलेल्या बैलजोड्यांनी वेधले नागरिकांचे लक्ष, पारंपरिक संस्कृतीचा उत्साहपूर्ण आविष्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

शेतकऱ्याचा जिवाभावाचा साथीदार असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा सण खापरखेडा येथे गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सायंकाळच्या सुमारास मुख्य मार्गावर सजवलेल्या बैलजोड्या दाखल झाल्याने परिसराला जणू पारंपरिक उत्सवाचे स्वरूप आले होते. शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना स्वच्छ आंघोळ घालून रंगीबेरंगी झुली, गोंडे, घंटा तसेच विविध अलंकारांनी सजविले होते. काही बैलांच्या शिंगांना आकर्षक रंग देण्यात आले होते. सजलेल्या बैलजोड्या पाहण्यासाठी मुख्य मार्गावर नागरिकांची गर्दी झाली होती. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकांनी या पारंपरिक सोहळ्याचा आनंद घेतला.

वर्षभर शेतीच्या कामात शेतकऱ्याला साथ देणाऱ्या बैलाची पूजा करून त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा पोळ्याच्या माध्यमातून जपली जाते. आधुनिक युगात शेतीच्या पद्धती बदलत असल्या तरी पोळ्याच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृती आणि शेतकरी जीवनाशी जोडलेली परंपरा आजही कायम असल्याचे यावेळी दिसून आले. मुख्य मार्गावर सजलेल्या बैलजोड्या आणि त्यांना पाहण्यासाठी जमलेली नागरिकांची गर्दी यामुळे खापरखेड्यात पोळ्याचा उत्साह शिगेला पोहोचला होता. पारंपरिक वेशभूषा, बैलांची आकर्षक सजावट आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे पोळा सणाची रंगत आणखी वाढली.

## विदर्भस्तरीय 'भजन रंग' स्पर्धा २० सप्टेंबरला

### श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्टतर्फे भव्य आयोजन, भरघोस बक्षिसे जिंकण्याची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री गणेशोत्सवानिमित्त श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट, झिल्पी, मोहगाव यांच्या वतीने व ट्रस्टचे अध्यक्ष संदीप जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विदर्भस्तरीय 'भजन रंग' भव्य भजन स्पर्धेचे



रविवार, २० सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही स्पर्धा चालेल. 'भजन रंग' स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून, भजन मंडळांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. स्पर्धेचे परीक्षण नागपुरातील भजन व संगीत क्षेत्रातील जाणकार व्यक्तींकडून करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना भरघोस बक्षिसे दिली जाणार आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेत्या मंडळाला ४१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ३१ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाला २१ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय उत्कृष्ट नऊ मंडळांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची ९ उत्तेजनार्थ बक्षिसे आणि ७ हजार रुपयांचे एक विशेष पारितोषिक दिले जाणार आहे. या स्पर्धेत प्रवेशाची अंतिम तारीख १६ सप्टेंबर असून इच्छुक भजन मंडळांनी अधिक माहितीसाठी व नावे नोंदणीसाठी ९३५९००७९३२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रफुल्ल माटेगांवकर, नीरज दोंतुलवार तसेच श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्टचे विश्वस्त यांनी केले आहे.

## युवा वैज्ञानिकांसाठी 'संडे स्किल लॅब' शिक्षकांसाठी प्रशिक्षण, नागरिकांसाठी एआय सत्र

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

युवा विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कौशल्यविकासाला चालना देण्यासोबतच शिक्षकांचे विज्ञान अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये विज्ञानविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरी तर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. एक्सप्लोरेटरीतर्फे 'संडे स्किल लॅब फॉर यंग सायंटिस्ट्स' या नावाने प्रात्यक्षिकाधारित विज्ञान कार्यशाळांची मालिका सुरू करण्यात येत आहे. या मालिकेतील पहिले सत्र २० सप्टेंबर २०२६ रोजी, रविवारी आयोजित करण्यात आले आहे. युवा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग, वैज्ञानिक संकल्पना आणि कौशल्यविकासाचा अनुभव देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

याशिवाय, परम फाउंडेशन, बंगळुरू यांच्या सहकार्याने उच्च माध्यमिक स्तरावरील विज्ञान व गणित विषयांच्या शिक्षकांसाठी 'RAISE – Reinorcing Academic Instruction and Science Education' या विषयावर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. विज्ञान व गणिताचे अध्यापन अधिक परिणामकारक, रंजक आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी या प्रशिक्षणातून शिक्षकांना मार्गदर्शन मिळणार आहे.

दरम्यान, नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'सिटिझन सायन्स सिरीज'च्या दुसऱ्या सत्रात 'Using AI' हा विषय केंद्रस्थानी असणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वाढता वापर, त्याचे दैनंदिन जीवनातील उपयोग आणि विज्ञानाशी असलेले नाते याबाबत या सत्रातून माहिती दिली जाणार आहे. इच्छुकांनी नोंदणी व अधिक माहितीसाठी PRSSEच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा नागपुरातील PRSSE कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गडकरींच्या जनसंपर्काला भर पावसात गर्दी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमाला नागपूरकरांनी भर पावसात हजेरी लावली. कुणी मागण्यांची निवेदने घेऊन, कुणी काम झाल्याबद्दल आभार व्यक्त करण्यासाठी तर कुणी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देण्यासाठी जनसंपर्क कार्यक्रमात सहभागी झाले होते.

रविवारी सकाळपासूनच नागपुरात मुसळधार पाऊस सुरू होता. अश्यात ना. श्री. गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात अडथळा निर्माण होण्याची शक्यता होती. पण भर पावसातच महाल येथील गडकरी वाड्यावर नागरिक मोठ्या प्रमाणात दाखल झाले. ना. श्री. गडकरी यांचे रविवारी सकाळी दोन पूर्वनियोजित कार्यक्रम होते. त्या कार्यक्रमांनंतर ते जनसंपर्क कार्यक्रमाला उपस्थित राहणार होते. परंतु, पाऊस सुरू असतानाही लोक आपली निवेदने घेऊन येत असल्याचे बघून मंत्री महोदयांनी पहिले नागरिकांना भेटण्याचा निर्णय घेतला. नागपूरच्या कानाकोपऱ्यातून आलेले नागरिक खोळंबून राहू नये, यासाठी त्यांनी त्यांची निवेदने स्वीकारून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. बहुतांश नागरिकांना तत्क्षणी ना. श्री. गडकरी यांनी पत्र देऊन दिलासा दिला.

यावेळी नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हाधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, सेतू कार्यालय, महावितरण, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, सीआरसी आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ना. श्री. गडकरी यांनी त्या त्या विभागांशी निगडीत निवेदनांवर संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांची निवेदने समजून घेत त्यावर तोडगा काढण्याचे आदेशही दिले. रस्ते, कृषी, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांशी संबंधित निवेदने नागरिकांनी मंत्री महोदयांना दिली. त्याचवेळी अनेकांनी ना. श्री. गडकरी यांच्या सहकार्यामुळे काम झाल्याबद्दल त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विविध गणेश मंडळांनी ना. श्री. गडकरी यांची भेट घेऊन गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या, तसेच मंडळाला भेट देण्याचे निमंत्रण दिले.

## साभिनय संस्कृत-कथा प्रस्तुती प्रतियोगिता उत्साहात संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




बालकांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, संस्कृत भाषेविषयी बालमनात प्रेम व जिज्ञासा निर्माण व्हावी तसेच संस्कृत साहित्याचा संस्कारक्षम आणि आनंददायी परिचय नव्या पिढीला व्हावा, या उद्देशाने संस्कृत भाषा प्रचारिणी सभा, नागपूरच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेली 'साभिनय संस्कृत-कथा प्रस्तुती प्रतियोगिता - २०२६'उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. ही स्पर्धा आकर्षण सभागृह, स्कूल ऑफ स्कॉलर्स, अत्रे लेआऊट, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संस्कृत भाषेत विविध कथा वेशभूषेसह साभिनय सादर केल्या.

विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतील कथा प्रभावी उच्चार, आवाजातील चढ-उतार, योग्य विराम, चेहऱ्यावरील भाव, हातवारे आणि देहबोलीच्या माध्यमातून सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. बालवयात संस्कृत भाषेची गोडी निर्माण झाल्यास भविष्यात संस्कृतच्या संवर्धनासाठी सक्षम आणि संस्कारक्षम पिढी घडण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्कृत भाषा प्रचारिणी सभा, नागपूर तसेच आयोजन समितीतील श्रद्धा तेलंग, किरण देशमुख, प्रशांत मंग्दे आणि अनिल देव यांनी विशेष परिश्रम घेतले.

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय विस्तार सेवा मंडळ संचालक डॉ पराग जोशी यांचे हस्ते स्पर्धेचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन झाल्यानंतर लगेच स्पर्धेला प्रारंभ झाला, तर समारोपाला प्रमुख पाहुणे म्हणून आभा मेघे, संस्कृत पंडिता डॉ लिनाताई रस्तोगी, डॉ चंद्रगुप्त वर्णेकर, श्रद्धा तेलंग, संजय रहाटे, यांचे हस्ते विजयी स्पर्धकांना बक्षीस प्रदान करण्यात आले, स्पर्धेचे परीक्षण संस्कृत भाषा, साहित्य, शिक्षण आणि कला क्षेत्रातील तज्ज्ञ परीक्षकांनी केले. डॉ नंदा पुरी, डॉ. स्मित होटे डॉ पल्लवी कावळे, दीपा पत्की यांनी परीक्षक म्हणून भूमिका पार पाडली.स्पर्धेतील सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -**

अ गट वर्ग ५ ते ७ बाल गट

प्रथम हार्दिक इखार, द्वितीय श्रावणी डेकाटे, तृतीय शर्वरी पुसदकर, उत्तेजनार्थ - स्पृहा फुलाने, प्रांजल सिंग, स्पृहा ढोले, विशेष पुरस्कार शौर्य पुजारी

ब गट वर्ग ८ ते १० किशोर गट,

प्रथम नाजुक्ता तुमसरे, द्वितीय श्रेया करंदीकर, प्रिंशा चांदेकर (विभागून) तृतीय हर्षिता सिरिया, उत्तेजनार्थ सायरा अंधारे, अकोला, अथर्व पांडेय संस्कृत भाषेच्या प्रचार-प्रसाराबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास निर्माण करणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन आणि आभार प्रदर्शन अनिल देव यांनी केले, स्पर्धेला डॉ वीणा गाणू, डॉ अनिल कवडे, विलास कुबडे, श्रीकांत जोशी, योगेश राऊत उपस्थित होते.

## रसिकांनी गायले, नाचले आणि लुटला भक्तिसंगीताचा मनमुराद आनंद

### श्रीकृष्ण गीत गवळण संध्याला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त सुरभक्ती संगीत प्रस्तुत आणि तांडव क्रिएशन, कलाकार मंच व महामृत्युंजय कल्याणकारी संस्था यांच्या सहकार्याने आयोजित 'श्रीकृष्ण गीत गवळण संध्या - भाग ५' हा भक्तिसंगीताचा सोहळा गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे उत्साहात संपन्न झाला. पाचव्या वर्षात पदार्पण केलेल्या या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. श्रीकृष्णाच्या प्रेम, भक्ती आणि बाललीलांवर आधारित गीत-गवळणींच्या सादरीकरणाने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. गायक-गायिकांसोबत रसिक श्रोत्यांनीही अनेक गीते आणि गवळणी उत्स्फूर्तपणे गात कार्यक्रमात सहभाग घेतला. लोकप्रिय गवळणी सुरू होताच रसिकांनी ताल धरत नृत्याला सुरुवात केली. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी गाणे, टाळ्या आणि नृत्याचा मनमुराद आनंद लुटला. काही क्षण तर संपूर्ण सभागृहच एकत्र गात आणि नाचत असल्याचे आनंददायी चित्र पाहायला मिळाले. श्रीकृष्णाच्या भक्तीत रंगलेल्या रसिकांच्या उत्साहामुळे कलाकारांचाही उत्साह द्विगुणित झाला. भक्ती, संगीत आणि आनंदाचा हा अनोखा संगम उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमात सहभागी गायक-गायिका आणि वाद्यवृंद कलाकारांनी आपल्या सुरेल व दमदार सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. सुरेल भक्तिगीतांपासून जोशपूर्ण गवळणींपर्यंत प्रत्येक सादरीकरणाला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. श्रीकृष्ण गीत गवळण संध्या, हा कार्यक्रम केवळ ऐकण्यापुरता मर्यादित न राहता रसिकांनी तो गात, नाचत आणि मनापासून अनुभवत साजरा केला. संपूर्ण सभागृहात दिसून आलेला आनंद, उत्साह आणि भक्तिमय वातावरण आयोजकांसाठीही विशेष समाधान देणारे ठरले. पाचव्या वर्षातील हा सोहळा रसिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अविस्मरणीय ठरला.

## सावनेर तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालय अव्वल

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**



सावनेर तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयाच्या १७ वर्षीय कबड्डी संघाने दमदार कामगिरी करत आपल्या वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामन्यात आदर्श विद्यालय, पाटणसावंगी संघाचा पराभव करत महाराष्ट्र विद्यालयाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

सावनेर तालुका क्रीडा संकुल येथे झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाच्या संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. पहिल्या सामन्यात सारस्वत पब्लिक स्कूल, सावनेरचा २०-८ असा पराभव केला. त्यानंतर उपांत्यपूर्व सामन्यात भालेराव हायस्कूल, सावनेरचा २३-९ असा धुव्वा उडवला.

उपांत्य सामन्यात नगर परिषद राजेंद्र हायस्कूल, खापा संघाविरुद्ध महाराष्ट्र विद्यालयाने तब्बल ३३-१७ असा विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात आदर्श विद्यालय, पाटणसावंगी संघाला ३८-१४ अशा मोठ्या फरकाने पराभूत करत विजेतेपद पटकावले. संघाचा कर्णधार अंसुन देहारे याने स्पर्धेत विशेष उल्लेखनीय कामगिरी केली. चढाई करताना त्याने तब्बल ४० गुण मिळवले, विशेष म्हणजे संपूर्ण स्पर्धेदरम्यान एकदाही चढाई करताना तो बाद झाला नाही.

विजयी संघात कर्णधार अंसुन देहारे याच्यासह क्षितीज अंजनकर, भावेश ढोके, दिव्यांशू ढोंगे, भावेश चिखले, ऋषभ कडवे, हरिकृष्ण मेश्राम, नमन खिळेकर, तन्मय गुजरमाळे, उज्वल भंडारे, मंथन खैरे आणि देवेंद्र खंगार यांचा समावेश आहे. संघाला क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. या विजयामुळे महाराष्ट्र विद्यालयाचा संघ आता कामठी तालुक्यातील आजणी येथे होणाऱ्या शालेय नागपूर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत सावनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

विजयी संघाचे महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार, सचिव सुहासताई केदार, कोषाध्यक्ष संध्या ठाकरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे, पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचारीवर्गाने अभिनंदन केले.

## 'कै. लीलाताई फडणवीस स्मृती गोंधळ-जोगवा स्पर्धा २०२६'चे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर आणि बाल कला अकादमी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कै. लीलाताई फडणवीस स्मृती गोंधळ-जोगवा स्पर्धा २०२६चे आयोजन करण्यात आले आहे. नागपुरातील शैक्षणिक संस्थेतील शिक्षक, महाविद्यालयीन प्राध्यापक, भजन मंडळ, अध्यात्मिक संस्था तसेच संगीत विद्यालय इत्यादींशी संबंधित महिलांसाठी खुली आहे. स्पर्धेची प्राथमिक फेरी शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर व अंतिम फेरी दि. १३ ऑक्टोबर रोजी श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, महाल येथे आयोजित करण्यात आली आहे.

वादकांसह १५ जणांचा सहभाग असलेल्या चमूंनी मराठी भाषेतील देवीचा पारंपरिक गोंधळ किंवा जोगवा ७ मिनिटांच्या कालावधीत सादर करायचा आहे. विजेत्या चमूंना स्मृतीचषक आणि आकर्षक रोख पारितोषिके प्रदान करण्यात येतील. परीक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील. जोगवा गोंधळ प्रवेश निश्चिती अंतिम तारीख २५ सप्टेंबर पर्यंत करावी. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी सौ. अनिता सुरकार - ९६३७७६४४७४ आणि सौ. राजेश्री धांडे - ९४०५१४८३०० यांच्याशी संपर्क साधावा.

# मोबाईलच्या शुल्लक वादातून वृद्धाची हत्या; तीन तरुणांना अटक, एक अल्पवयीन ताब्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

पारशिवनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डोरली गावात गुरुवारी मध्यरात्री मोबाईल फोनवरून झालेल्या वादाचे पर्यवसान एका ५५ वर्षीय व्यक्तीच्या हत्येत झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत तीन संशयितांना अटक केली असून एका अल्पवयीन बालकाला ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोरली येथील रहिवासी आणि ग्रामपंचायतीचे कचरा गाडी चालक राजू हुलासिंग तांडेकर (५५) हे गुरुवारी मध्यरात्री १ च्या सुमारास सोबत उभे असताना, मोबाईलच्या कारणावरून त्यांचा काही तरुणांशी वाद झाला. या वादाचे रुपांतर नंतर मारामारीत झाले. या घटनेत राजू तांडेकर आणि त्यांचे सोबती पृथ्वीराज डोंगरे (४५) यांना गंभीर मारहाण करण्यात आली. आरोपी घटनास्थळावरून पसार झाल्यानंतर शुक्रवारी सकाळी राजू तांडेकर यांचा मृतदेह रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आला. यानंतर सकाळी त्यांच्या मुलानी( अजय तांडेकर) त्यांना चहा पाजला व हॉस्पिटल घेऊन जाताना त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच डोरली गावात खळबळ उडाली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल मस्के यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि गावकऱ्यांशी संवाद साधला. जखमी पृथ्वीराज डोंगरे यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू असून, त्यांच्या जबानीवरून तपासाला गती मिळाली आहे.

मृतकाचा मुलगा अजय तांडेकर याच्या तक्रारीवरून पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी आलोक गजभिये, विशाल वाघमारे आणि आदित्य देशपांडे या तिघांना अटक करण्यात आली असून, एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. संशयावरून ताब्यात घेतलेल्या अन्य एका युवकाला चौकशीनंतर सोडून देण्यात आले.

**शवविच्छेदन अहवालावर पुढील तपास अवलंबून**

मृतदेहाची प्राथमिक तपासणी पारशिवनी येथे केल्यानंतर, मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी मृतदेह नागपूरच्या मेयो रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. वैद्यकीय अहवाल आणि साक्षीदारांच्या जबाबाच्या आधारे पारशिवनी पोलीस पुढील कायदेशीर तपास करत आहेत. गावातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## रामटेक येथे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये विविध प्रकरणांचा निपटारा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

दिनांक १२ सप्टेंबर २०२६ ला नागपूर जिल्हा विधी सेवा समीती यांच्या आदेशान्वये तालुका विधी सेवा रामटेक चे तालुका विधी सेवा समीती अध्यक्ष तथा वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश एस.व्ही. थोडगे यांच्या अध्यक्षतेत दोन पॅनल मध्ये कामकाज करण्यात आले. वरीष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश एस. व्हि. थोडगे,सहदिवाणी न्यायाधीश २ रे कनिष्ठ स्तर श्रीमती. डी. सी. वोराणी उपस्थीत होते. पॅनेल वर पॅनल मेंबर म्हणुन अॅड. आर. गजभिये व अॅड. पी. के. महाजन यांनी कामकाज बघीतले. राष्ट्रीय महा लोकअदालतीमध्ये नेमलेल्या पॅनेल समोर दिवाणी व फौजदारी, (१३८) एन.आय. अॅक्ट, बँक पतंसस्थाचे दाखल पुर्व प्रकरणे तसेच ग्रामपंचायतीचे घर व पाणी, वीज बील करांची प्रकरणे ठेवण्यात आली. त्यापैकी ०८ दिवाणी व १३३ फौजदारी प्रकरणे, बँकेतील तसेच घर टॅक्स बील दाखल पुर्व प्रकरणे असे एकुण १०० प्रकरणांतुन एकुण रुपये ५,११,८५७/- रुपए च्या प्रकरणातुन तडजोड करून निपटारा करण्यात आला.

तालुका वकील संघा तर्फे या कार्यक्रमाला तालुका वकील संघाचे अध्यक्ष अॅड. देवळे, सचिव ए.व्ही. गजभीये, अॅड. एम. व्ही. येरपुडे, अॅड. एस. एस. खंडेलवाल,अॅड. स्वाती वाहणे,अॅड. एन. पी. बागडे, अॅड. बांते, अॅड.जयश्री मेंघरे, अॅड.अरविंद कारेमोरे, अॅड. एस. सी. केला, अॅड. अरूण महाजन सह आदी सदस्य उपस्थीत होते. या कार्यक्रमाला एस.बी.आय., युको बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा या बॅकेचे मॅनेजर, बॅकेतील कर्मचारी व ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाला न्यायालयाचे कर्मचारी एस एस माने, सहा. अधिक्षक, सौ. एस. पी.रत्नपारखी, सहा. अधिक्षक, लघुलेखक राजेश खोब्रागडे, कु. डी. भिवगडे, वरिष्ठ लिपीक प्रशांत भागवत, संदीप गिरडकर, सौ. व्ही. पी वासनीक, सौ. कांबळे,ज्योती ए. मोरे, तसेच कनिष्ठ लिपीक, प्रिया खेडकर,सीमा राउत, गुरुमुखी,धनजोडे, ए. गजभिए, मुशीब अखतर, शिपाई संदीप लहासे, बेलखोडे, मदतनीस अभिषेक उईके व कोर्ट मोहरीर वनश्री सपाटे यांनी कामकाज बघीतले. याप्रसंगी रामटेक उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते,पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात यांचे सहकार्य लाभले.

## सार्वजनिक उत्सवांमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडरचा वापर बंधनकारक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सणासुदीच्या काळात एलपीजी सिलिंडरचा सुरक्षित व नियमबद्ध वापर व्हावा तसेच सार्वजनिक उत्सवांच्या भोजनासाठी घरगुती सिलिंडरचा वापर होणार नाही याची दक्षता गॅस एजन्सींनी घ्यावी यासाठी अन्नधान्य वितरण कार्यालयाद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी अन्नधान्य वितरण अधिकारी एस. गेडाम, अन्नधान्य वितरण अधिकारी पंकज जळोकर, एलपीजी नोडल अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी शसागर बावरे, पुरवठा निरीक्षक विनोद वागदे, वैभव खैरकर, शिल्पा दरेकर, प्रदीप भावे आणि गॅस कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सणासुदीच्या व उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहरात सार्वजनिक ठिकाणी घरगुती एलपीजी सिलिंडरचा गैरवापर टाळून केवळ व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचाच वापर करण्याची व सार्वजनिक उत्सवांसाठी दिल्या जाणाऱ्या अधिकृत परवानगीपत्रामध्ये व्यावसायिक सिलिंडरची अट अनिवार्य करण्यात आली आहे.

ओटीपी मिळूनही सिलिंडर न मिळणाऱ्या तक्रारींची दखल घेण्यात आली असून गॅस बुकिंगनंतर ग्राहकांना ओटीपी प्राप्त होऊनही वेळेत सिलिंडर पुरवला जावा. ग्राहकांना वेळेत व नियमानुसार सिलिंडर उपलब्ध करून देण्याचे निर्देश गॅस एजन्सीधारकांना देण्यात आले. गॅसचा काळाबाजार, अनधिकृत साठवणूक किंवा बेकायदेशीर विक्री रोखण्यासाठी गॅस कंपन्यांनी आपापल्या स्तरावर नियमित तपासणी व नियंत्रण ठेवण्याबाबत यावेळी संबंधितांना सांगण्यात आले. ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन यांच्याकडून प्राप्त सूचनांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

## जि.प.प्रशाला येथे शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन



**दै. सिंहवाणी वृत्त, जवळा बाजार**

शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यासाठी पालकांना लेखी सुचना देवून ८ तारखेला शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यासाठी प्रत्येक वर्गातून एक पुरुष आणि स्त्री यांची निवड बहुमताने करण्यात आली. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवड करण्यात आली. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालाजी बाबूराव जाधव आणि उपाध्यक्ष सविता निलकंठ अंभोरे यांची सर्व बहूमताने निवड करण्यात आली. तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य ममता व्यवहारे, विठ्ठल नाईकनवरे, हिराजी घोगरे, अनुसया जाधव, हाराळे ज्ञानेश्वर, सुधाकर चौधरी, ज्योती रावले, सुलतानाबी शेख, बबन सुर्यतळ, ज्योती धडके यांची निवड करण्यात आली. शिक्षण प्रेमी म्हणून लिंबाजी देशमुख यांची सुध्दा बहुमताने निवड करण्यात आली आणि शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्रीमती पाटील मॅडम यांची निवड करण्यात आली. यासाठी शाळेतील मुख्याध्यापक राठोड सर, प्रमुख भूमिका निभावली सर्वांनी सहकार्य लाभावे ही इच्छा व्यक्त केली तसेच सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

# आस्था निवारागृहाच्या 'आस्थेने' 'त्या'ला हरविलेली वाट गवसली !

### नेपाळी नागरिकाची महिन्याभरानंतर कुटुंबाशी पुन्हा भेट, समाजसेवा अधिक्षक कुंदा बिडकर यांनी २४ तासांत शोधले कुटुंब



सिंहवाणी वृत्त विशेष

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

१० ऑगस्ट रोजी घरातील कुणालाही न सांगता तो कामाच्या शोधात घरातून निघाला. मागे पत्नी, एक मुलगा आणि दोन मुली तसेच वयोवृद्ध आईवडील. त्यातील एक मुलगी नुकतीच ४५ दिवसांची झालेली. गावातील शेतांमध्ये मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे पती-पत्नी यांना मुलांच्या भविष्याची चिंता रात्रीच्या काळोखात दडून बसल्यासारखे मनात मांडून असायचे. याच भावनेने ४१ वर्षीय खडका बहादूर दर्जी आईवडीलांचा आशिर्वाद घेऊन घरातून निघाला. नेपाळवरून थेट दिल्ली गाठले. त्याच्या सांगण्याप्रमाणे अतिशय भुकेलेल्या अवस्थेत वाटेत कुणीतरी संदिग्ध खायला दिले. आणि त्यानंतर मानसिकदृष्ट्या अस्वस्थता जाणवू लागली. दिल्लीवरून तामिळनाडू एक्सप्रेसमध्ये प्रवास करून त्याने कुणीही परिचित नसलेल्या नागपुरात आपल्या प्रवासाला विराम दिला. नागपुरातील मुख्य रेल्वेस्थानकाच्या गर्दीत भांबावलेला खडका एक दिवस रेल्वे स्थानकाबाहेरही पडला नाही. त्यानंतर दोन-तीन दिवस कामाच्या शोधात वणवण भटकला. मनोरूग्णासारखी अवस्था असल्यामुळे कुणी त्याला कामही दिले नाही. अशात या अनोळखी शहरात रस्त्या व फुटपाथ त्याचे घर झाले.

खडका बहादूर सोमबहादूर दर्जी (वय ४१), रा. निस्कोट, दरबांग, जिल्हा म्याग्दी, नेपाळ यांना १२ ऑगस्ट २०२६ रोजी धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर शहर यांच्या माध्यमातून आस्था भिक्षेकरी निवारा केंद्रात दाखल करण्यात आले होते. केंद्रात त्यांच्या औषधोपचारासोबतच योग्य ती काळजी, समुपदेशन आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. त्यांचा मूळ पत्ता आणि कुटुंबीयांचा शोध घेण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले; मात्र त्यांचे अस्पष्ट बोलणे, भाषेची अडचण आणि अपूर्ण माहिती यामुळे शोध घेण्यात अडचणी येत होत्या. दरम्यान, नेपाळमध्ये निर्माण झालेल्या नैसर्गिक संकटाच्या बातम्यांमुळे खडका बहादूर अधिक अस्वस्थ झाले. आपल्या देशात आणि कुटुंबीयांकडे परत जाण्याची त्यांची तीव्र इच्छा वाढत असल्याचे आस्था निवारा केंद्राचे समन्वयक तुषार हुकरे यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूरच्या समाजसेवा अधीक्षक श्रीमती कुंदा काटेखाये-बिडकर यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली व मदतीची विनंती केली. बिडकर यांनी तत्काळ मदतीचे आश्वासन देत उपलब्ध माहितीच्या आधारे नेपाळमधील म्याग्दी जिल्ह्यातील दरबांग परिसरातील पोलिसांशी संपर्क साधला. मात्र एवढ्यावर न थांबता त्यांनी मनकामना ऐकता फाउंडेशन, ठाणे, महाराष्ट्रचे चेअरपर्सन व मुख्य सल्लागार शालिग्राम तिवारी यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकरण त्यांच्या निदर्शनास आणून दिले. श्री. तिवारी यांनी स्वतः व्हिडिओ कॉलद्वारे खडका बहादूर यांच्याशी संवाद साधून माहिती जाणून घेतली. त्यांच्या पुढाकारातून नेपाळ पोलीस दलाचे माजी उपमहानिरीक्षक प्रकाश अधिकारी यांच्या सहकार्याने अवघ्या २४ तासांच्या आत खडका बहादूर यांच्या नातेवाईकांचा व घराचा शोध घेण्यात आला.

त्यानंतर खडका बहादूर यांचा त्यांच्या भावासह जवळच्या नातेवाईकांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद घडवून आणण्यात आला. दीर्घकाळानंतर कुटुंबीयांचा आवाज ऐकताना खडका बहादूर यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि भावनिक क्षण उपस्थितांसाठीही अत्यंत हृदयस्पर्शी ठरला.

नातेवाईकांना नागपूरला आणण्यासाठी प्रवासाच्या तिकिटांची अडचण निर्माण झाली होती. त्यावेळी श्रीमती कुंदा काटेखाये बिडकर यांच्या विनंतीवरून नागपूरचे राजेश बजाज यांनी कोणतेही अतिरिक्त शुल्क न घेता नातेवाईकांच्या येण्या-जाण्याची तिकिटे उपलब्ध करून दिली. समाजोपयोगी कार्यात बजाज यांचे सातत्याने मिळणारे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले. अखेर १३ सप्टेंबर २०२६ रोजी खडका बहादूर यांच्या नातेवाईकांनी नागपूर येथील आस्था निवारा केंद्रात पोहोचून त्यांची भेट घेतली. अनेक दिवसांची प्रतीक्षा संपवत कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट झाली आणि आनंदात कुटुंब पुनर्भेट पार पडले.

या भावनिक पुनर्भेटीचा क्षण शालिग्राम तिवारी आणि नेपाळ पोलीस दलाचे माजी उपमहानिरीक्षक प्रकाश अधिकारी यांनी व्हिडिओ कॉलद्वारे प्रत्यक्ष पाहायची त्यांची इच्छा होती, परंतु तांत्रिक कारणाने शक्य न झाल्यामुळे त्यांनी शुभेच्छा पाठविल्या. सीमांच्या पलीकडे जाऊन माणुसकीच्या नात्याने केलेल्या या प्रयत्नाचे त्यांनी समाधान व्यक्त केले.

या कुटुंब भेटीच्या कार्यक्रमाचे आयोजन सह्याद्री फाउंडेशन आणि आस्था संस्थेचे संचालक देवेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. आजच्या कौटुंबिक पुनर्मिलन कार्यक्रमात सह्याद्री फाउंडेशनचे प्रकल्प प्रमुख दिपक पसारकर, समन्वयक तुषार हुकरे, वैभव बागडे तसेच आस्था निवारा केंद्रातील कर्मचारी आणि निवारा गृहातील १३८ लाभार्थी आणि समाजसेवा अधीक्षक कुंदा काटेखाये बिडकर, दैनिक सिंहवाणी वृत्तचे मुख्य संपादक अजय बिवडे, काळजीवाहक अनंता सदाशिव नागोसे, कार्तिक रोहिदास कोडवते उपस्थित होते. कौटुंबिक पुनर्मिलन कार्यक्रमात नेपाळी नागरिकाचे पुष्पगुच्छ देऊन आणि आरती ओवाळून स्वागत करण्यात आले, आणि सर्वांनी त्याला पुढील निरोगी, आनंदी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. सह्याद्री फाउंडेशनच्या वतीने या कौटुंबिक पुनर्मिलन कार्यात मोलाची कामगिरी बजाविल्याबद्दल मनकामना एकता फाउंडेशनचे शालिग्राम तिवारी आणि कुंदा काटेखाये बिडकर यांना पुष्पगुच्छ व प्रशंसा प्रमाणपत्र प्रकल्प संचालक दिपक पसारकर यांच्या हस्ते देण्यात आले. एक अनोळखी व्यक्ती, अपूर्ण माहिती, भाषेची अडचण आणि दोन देशांमधील अंतर, या सर्व अडथळ्यांवर मात करत केवळ माणुसकीच्या भावनेतून झालेला हा प्रयत्न एका कुटुंबाला पुन्हा एकत्र आणणारा ठरला.

# भरती प्रक्रियासंबंधी अभिप्राय पाठवा : विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी

### भरती परीक्षा पद्धतीच्या सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती १६ सप्टेंबरला नागपुरात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भरती परीक्षा पद्धतीच्या सुधारणांसाठी उच्चस्तरीय समितीचा नागपूर येथील संवाद कार्यक्रमाच्या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे भेट देणार आहेत. राज्यातील स्पर्धा परीक्षार्थींच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत नागपूर महसूल विभागातील सर्व संबंधित घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सूचना व अभिप्राय समितीसमोर सादर करावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी केले.

विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभाकक्षात याबाबत आढावा बैठक घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर आयुक्त प्रदीप कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक निवृत्ती राठोड तसेच माहिती व जनसंपर्क कार्यालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी मनपा तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीनुसार, राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी, नागरिक आणि अन्य संबंधित घटकांकडून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत. या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सिव्हिल लाईन्स येथे कामकाजाच्या अनुषंगाने भेट देणार आहेत. त्यापूर्वी नागपूर विभागातील संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहे.

सूचना व अभिप्राय निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे सादर करता येतील. प्रत्यक्ष सूचना निवासी उपजिल्हाधिकारी यांची स्वीय शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे स्वीकारण्यात येतील. तसेच nagpur-examreformstaskforce@maharashtra.gov.in या ई-मेलवरही लेखी अभिप्राय पाठविता येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांनी विहित मुदतीत ई-मेलद्वारे आपले अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यमान परीक्षा प्रणाली व विविध विभाग, प्राधिकरणे तसेच परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीचा आढावा, परीक्षा अधिक सुरक्षित, निष्पक्ष, पारदर्शक व उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल प्रक्रियेपर्यंतची सुरक्षा, प्रश्नपत्रिकेचे मॉडरेशन, डिजिटल अथवा मुद्रित वितरण, गोपनीय वाहतूक, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, प्रतिसाद नोंदणी आणि मूल्यांकन याबाबत सूचना अपेक्षित आहेत.

तसेच बायोमेट्रिक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, ऑडिट ट्रेल्स आणि सीसीटीव्ही देखरेख यांसारख्या माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, पेपरफुटी, गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा गैरवापर रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय व उत्तरदायित्व निश्चित करणे याबाबतही अभिप्राय मागविण्यात आले आहेत. इतर राज्ये अथवा देशांतील यशस्वी व आधुनिक परीक्षा पद्धतींचा अभ्यास, परीक्षा केंद्रांसाठी किमान पायाभूत व सुरक्षा मानके, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग आणि परीक्षा संस्थांमधील समन्वय तसेच उमेदवारांसाठी जलद व पारदर्शक तक्रार निवारण प्रणाली याबाबतही सूचना देता येणार आहेत.

# लोकमतचे नरेश डोंगरे, गिरीधर देशमुख, मोहन अटाळकर यांना स्वर्गीय अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार प्रदान

### विदर्भातील प्रतिष्ठित पत्रकारिता पुरस्काराचे वितरण





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भातील पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पत्रकारांना गौरविणारा प्रतिष्ठित 'स्वर्गीय अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार' वितरण सोहळा रविवारी नागपूर प्रेस क्लब येथे उत्साहात पार पडला. यंदाचा पुरस्कार 'लोकमत'चे उपमुख्य संपादक नरेश डोंगरे, वरूड येथील दैनिक कॅलिफोर्निया टाइम्स'चे मुख्य संपादक गिरीधर देशमुख आणि 'लोकसत्ता'चे विशेष प्रतिनिधी मोहन अटाळकर यांना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. उपेंद्र कोठेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी २१ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि मानचिन्ह असे आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.शरद पाटील होते. व्यासपीठावर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, प्रेस क्लबचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार प्रदीप कुमार मैत्र, महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, निलेश खांडेकर आणि प्रगती पाटील उपस्थित होते. विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने गेल्या चार दशकांपासून या पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. यावेळी स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्येष्ठ कवी, विचारवंत आणि स्वातंत्र्य संग्रामात मोलाचे योगदान देणारे स्व.अनिलकुमार यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

प्रमुख पाहुणे डॉ. उपेंद्र कोठेकर म्हणाले, महाराष्ट्राला पत्रकारितेची गौरवशाली परंपरा लाभली आहे. स्वातंत्र्यलढा असो किंवा संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, वृत्तपत्रांनी नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली. जुन्या पिढीतील पत्रकारांच्या पायावरच आजची पत्रकारिता उभी आहे. आजही जनतेचा पत्रकारितेवरील विश्वास कायम आहे. अध्यक्षीय भाषणात प्रा. शरद पाटील यांनी पत्रकारितेतील विश्वासार्हतेचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. गिरीश गांधी आणि प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी प्रास्ताविकातून पुरस्काराची भूमिका स्पष्ट केली. सूत्रसंचालन रेखा दंडिगे यांनी केले, तर आभार निलेश खांडेकर यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येत विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.